


सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com | E-Mail : prajasattaknews24@gmail.com | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक -९२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि.३० एप्रिल २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


# कुछ तो बडा होने वाला है...!
# पंतप्रधान नरेंद्र मोदींचा रशिया दौरा रद्द

## रशियाच्या नेत्याचे जाहीर विधान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नवी दिल्ली**

जम्मू काश्मीरमध्ये पाकिस्तानने दहशतवादी हल्ला केल्यानंतर भारताने मोठ्या कारवाईची तयारी सुरु केली आहे. मंगळवारी भारत सरकारने सैन्याच्या तिन्ही दलांना कारवाई कशी करणार, कधी करणार याची निवड करण्यासाठी फ्री हँड दिला आहे. यामुळे पाकिस्तानमध्ये एलओसीपर्यंत काल रात्रीपासूनच लढाऊ विमाने घिरट्या घालत होती. गेल्याच आठवड्यात भारताविरोधात गरळ ओकणारा पाकिस्तानचा लष्कर प्रमुख देश सोडून गेला किंवा बंकरमध्ये लपला असल्याचे दावे केले जात आहेत. अशातच येत्या काही दिवसांत काहीतरी मोठे होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

येत्या ९ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे रशियाच्या विजय दिवसाला प्रमुख पाहुणे म्हणून जाणार होते. यानंतर रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतीन भारताच्या दौऱ्यावर येणार होते. परंतू, पुतीन यांचे खास असलेले प्रेस सचिव दिमित्री पेस्कोव यांनी पंतप्रधान मोदी यांनी रशियाचा आगामी दौरा रद्द केला असल्याची माहिती दिली आहे. मोदी येत्या विजय दिवसाला येणार नसल्याचे पेस्कोव यांनी म्हटले आहे.

हा दौरा रद्द झाल्याचे भारताने नाही तर रशियाने जाहीर केले आहे, यातही बरेच काही आले आहे. हा दौरा रद्द होण्यामागचे कारण रशियाने दिलेले नाही. भारताकडून यावर कोणताही प्रतिक्रिया आलेली नाहीय. दुसऱ्या महायुद्धात रशियाने जर्मनीवर मिळवलेल्या विजयाच्या ८० व्या वर्धापन दिनानिमित्त ९ मे रोजी होणाऱ्या विजय दिनाच्या परेडला उपस्थित राहण्यासाठी पंतप्रधान मोदींना आमंत्रित करण्यात आले होते. ९ मे रोजी सेनापती-प्रमुखांनी जर्मनीच्या बिनशर्त आत्मसमर्पणाच्या कायद्यावर स्वाक्षरी केली आणि युद्ध संपले होते.

# मोदी सरकार ॲक्शन मोडवर

## कधी, कुठे आणि केव्हा लष्करी कारवाई करायची, याचे संपूर्ण स्वातंत्र्य संरक्षण दलांना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नवीदिल्ली**

पहलगाममधील दहशतवादी हल्ला आणि त्यानंतर पाकिस्तानबरोबर निर्माण झालेल्या तणावाच्या स्थितीत भारत सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार समितीमध्ये (एनएसएबी) मोठे बदल केले आहेत. रॉचे (रिसर्च अँड ॲनालिसिस विंग) माजी अध्यक्ष आलोक जोशी यांची राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार समितीच्या अध्यक्षपदी नेमणूक करण्यात आली आहे. या समितीत इतर सहा सदस्यांचा देखील समावेश करण्यात आला आहे.राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार समितीत माजी एअर कमांडर पी. एम. सिन्हा, माजी लेफ्टनंट जनरल ए. के. सिंह, रिअर ॲडमिरल मोंटी खन्ना, राजीव रंजन वर्मासह लष्करी व भारतीय पोलीस सेवेतील निवृत्त अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

गेल्या आठवड्यात काश्मीर खोऱ्यातील पहलगाममधील बैसरन येथे दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळीबार केला. या दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटक ठार झाले. या हल्ल्यानंतर राष्ट्रीय सुरक्षेबाबत मोदी सरकार अधिक सतर्क झालं आहे. या हल्ल्याला लष्करी कारवाईद्वारे चोख प्रत्युत्तर देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी हिरवा कंदिल दिला. तसेच संरक्षणविषयक उच्चस्तरीय बैठकीमध्ये दहशतवाद चिरडून टाकण्यासाठी कधी, कुठे आणि केव्हा लष्करी कारवाई करायची, याचे संपूर्ण स्वातंत्र्य संरक्षण दलांना असेल, असा स्पष्ट व थेट संदेश मोदी यांनी दिला आहे.एनएसएबी हे एक असं पथक आहे ज्यामध्ये सरकारच्या बाहेरील प्रतिष्ठित व्यक्ती सहभागी असतात. प्रामुख्याने भारतीय लष्कर, गुप्तचर यंत्रणा, भारतीय पोलीस सेवेतून निवृत्त झालेले अधिकारी या समितीत काम करतात. देशाच्या सुरक्षेसंबंधीच्या मुद्द्यांचं विश्लेषण करणे, सुरक्षेसंबंधीच्या प्रश्नांवर उपाय व धोरणात्मक पर्यायांची शिफारस करणे हे या पथकाचं प्रमुख काम आहे. भारतीय गुप्तचर यंत्रणा रॉचे माजी अध्यक्ष आलोक जोशी आता या समितीचे प्रमुख म्हणून कामकाज पाहतील.

# पहलगामच्या हल्ल्यात धर्म आणायची गरज नाही
# तो देशावरचा हल्ला; 'त्या' विधानावर शरद पवारांचे स्पष्टीकरण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० मुंबई**

पहलगाममध्ये २६ निष्पाप लोकांची हत्या झाल्यानंतर देशभरात संतापाची लाट उसळली आहे. जगभरातून या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांसाठी संवेदना व्यक्त केल्या जात आहेत. या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ सर्वच राजकीय पक्षांनी कारवाई करण्यासाठी सरकारला पाठिंबा दर्शवला होता. या घटनेवर शरद पवार यांनी केलेल्या विधानाने सत्ताधाऱ्यांनी त्यांच्यावर टीकास्त्र सोडलं होतं. हिंदू आहे म्हणून गोळ्या घातल्या यामध्ये कितपत सत्य आहे ते मला माहिती नाही, पण घटनास्थळी उपस्थित असलेल्या स्त्रियांना सोडल्याचं दिसतंय असं शरद पवार म्हणाले. आता शरद पवार यांनी त्या विधानावरुन भाष्य केले आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर शरद पवार यांनी केलेल्या एका विधानावरुन टीका केली जात होती. शरद पवारांनी मतांच्या लांगूलचालनासाठी राजकारण करू नये, असं मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं होतं. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्यांचे नातेवाईक यामध्ये मारले गेले आहेत त्यांनी काय सांगितलं ते ऐकावं आणि मत मांडावं असे म्हटलं होतं. ठाण्यात पत्रकारांनी याविषयी विचारले असता शरद पवार यांनी भाष्य केले आहे.

त्यात टीकेचा विषय काय होता. कशासाठी टीका केली जातेय. जे काही पहलगामला झालं तो माझ्या मते हा देशावरचा हल्ला आहे. ज्या व्यक्ती यामध्ये शहीद झाल्या त्यांनी देशासाठी किंमत मोजली आहे. त्यामुळे यामध्ये धर्म, जात, पात, भाषा या गोष्टी आणायच्या नाहीत. आज भारतीयांवर कुठल्या शक्तींचा हल्ला होत असेल तर देशवासीय म्हणून कशाचीही अपेक्षा न करता आपल्याला एकत्र यावे लागेल. मी जाहीरपणाने सांगितले होते की देशाचे पंतप्रधान आणि त्यांचे सहकारी जी काय उपाययोजना करत असतील त्याला पूर्ण सहकार्य आहे. हीच भूमिका घेऊन आम्ही पुढे जाणार आहोत, असे शरद पवार म्हणाले.

# देवेंद्र फडणवीसांच्या लेकीला दहावीत ९२ टक्के

## मुख्यमंत्री फडणवीसांचा 'वर्षा'मध्ये गृहप्रवेश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मुंबई**

आज अक्षय तृतीयाच्या शुभ मुहुर्तावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी आनंदाची बातमी आली आहे. आज सीआयएससीई (उखडउए) बोर्डाने १० वीचा निकाल जाहीर केला. यात मुख्यमंत्र्यांची मुलगी दिविजा हिने ९२% गुण मिळवले आहे. अमृता फडणवीस यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत ही गुडन्यूज सर्वांसोबत शेअर केली. विशेष म्हणजे, या पोस्टमध्ये अमृता यांनी आणखी एक गुडन्यूज सांगितली आहे.

अमृता फडणवीस यांनी नुकताच सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट सर्वांना अक्षय्य तृतीयाच्या शुभेच्छा दिल्या. यासोबतच दोन गुड न्यूज सर्वांसोबत शेअर केल्या. आपल्या पोस्टमध्ये अमृता लिहितात, 'सर्वांना अक्षय तृतीयेनिमित्त हार्दिक शुभेच्छा. आजच्या शुभमुहूर्तावर वर्षा या निवासस्थानी आम्ही छोटीशी पूजा संपन्न करत गृहप्रवेश केला. आजच्या दिवशीची आणखी एक अत्यंत आनंदाची बातमी आपल्या सर्वांना सांगताना मन खुशीने भरुन गेलंय. आमची सुकन्या दिविजा ही १०वीच्या बोर्ड परीक्षेत ९२.६० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे.'

# केंद्र सरकार जातीनिहाय जनगणना करणार, कॅबिनेट बैठकीत निर्णय

## २०११ साली झाली होती अखेरची जनगणना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नवी दिल्ली**

केंद्रातील नरेंद्र मोदी सरकार जातीनिहाय जनगणना करणार आहे. आज (३० एप्रिल) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी झालेल्या कॅबिनेट बैठकीत याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या निर्णयाची माहिती दिली आहे. कॅबिनेट बैठकीनंतर वैष्णव यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी ही घोषणा केली.

स्वतंत्र भारतात १९५१ साली पहिली जनगणना करण्यात आली होती. तर २०११ साली यूपीए सरकारच्या काळात अखेरची जनगणना झाली होती. २०२१ मध्ये पुन्हा ही जनगणना करणे अपेक्षित होते. मात्र, केंद्र सरकारने ही जनगणना केली नाही. परिणामी विरोधक गेल्या तीन वर्षांपासून सरकारवर टीका करत आहेत. तसेच जातीनिहाय जनगणना करण्याची मागणी करत होते. अखेर केंद्र सरकारने आता जातीनिहाय जनगणना करण्याची घोषणा केली आहे.लोकसभेचे विरोधी पक्षनेते तथा काँग्रेस नेते राहुल गांधी सातत्याने जनगणनेची मागणी करत होते. सरकार जातीनिहाय जनगणना का करत नाही? असा प्रश्न उपस्थित करत होते. अखेर त्यांची ही मागणी पूर्ण झाली आहे. दुसऱ्या बाजूला बिहारच्या विधानसभा निवडणुकीआधी केंद्र सरकारचा हा निर्णय मास्टरस्ट्रोक मानला जात आहे. नितीश कुमार यांच्या नेतृत्त्वाखालील बिहारमधील महायुतीच्या सरकारने यापूर्वी राज्यात अशी जनगणना केली होती. त्यानंतर बिहार सरकारने आरक्षणात काही बदल केले होते. परिणामी देशभरातून जातीनिहाय जनगणनेची मागणी होऊ लागली होती. आता बिहारच्या विधानसभा निवडणुकीआधी मोदी सरकारने जातीनिहाय जनगणना करण्याची घोषणा केली आहे.कॅबिनेट बैठकीतील या महत्त्वाच्या निर्णयाची माहिती देताना मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले, सामाजिक रचनेचा विचार करून आणि संविधानातील स्पष्ट तरतुदी लक्षात घेऊन मोदी सरकारने हा निर्णय घेतला आहे.




## संपादकीय ......

# पाणीटंचाईचे संकट

*महाराष्ट्रातील पाणीटंचाईचे संकट दिवसेंदिवस तीव्र होत असून, राज्यातील ३६ पैकी १७ जिल्ह्यांत टंचाईची समस्या गडद झाली आहे. अद्याप संपूर्ण मे महिना बाकी आहे आणि गेल्या काही वर्षांत मान्सूनचे आगमनही लांबणीवर पडल्याचा अनुभव आहे. या परिस्थितीत जिल्हाधिकार्यांनी पाणीटंचाई असलेल्या भागात दौरे करून तातडीच्या उपाययोजना कराव्यात, असे आदेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले असून, त्याची प्रभावी अंमलबजावणी होईल, अशी अपेक्षा.*

*उन्हाळ्याची तीव्रता दिवसागणीक वाढत असून, उन्हामुळे बाष्पीभवन लवकर होत असल्यामुळे धरणे व तलावांतील पाण्याची पातळी झपाट्याने खालावत आहे. ग्रामीण असो किंवा शहरी भाग, लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. शासन एकीकडे 'हर घर जल' योजनेच्या माध्यमातून घराघरांत पाणी पोहोचल्याचे सांगत आहे; पण दुसरीकडे विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या यवतमाळजवळच्या पारधी बेड्यावर अद्यापही मूलभूत सुविधा पोहोचलेल्या नाहीत. तेथे एक हातपंप होता आणि तोही उन्हाळ्यात कोरडा पडला. पिण्याच्या पाण्यासाठी तेथील महिला व मुलींना रोज जीव धोक्यात घालून काही अंतरावरील अरुणावती नदीकाठी जावे लागते. काही दिवसांपूर्वी याच नदीत पाणी भरण्याच्या प्रयत्नात पाय घसरून मुलीचा दुर्दैवी मृत्यू झाला.*

*'जलजीवन मिशन' योजनेत पाईपलाईन टाकली, टाकी बांधली; पण पाण्याचा स्रोतच जोडला नाही, असे अनेक ठिकाणी घडले. सध्या राज्यातील १७ जिल्ह्यांतील ४४७ गावे आणि १,३२७ पाड्यांत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असून, टँकरच्या मागणीत वाढ होत आहे. या परिस्थितीत प्रशासनाने टंचाईग्रस्त भागाशी संपर्क ठेवून, आवश्यक ती पावले तातडीने उचलली पाहिजेत. जिथे पाणीपुरवठा योजना प्रलंबित आहेत, त्या लवकरात लवकर पूर्ण कराव्यात. काही ठिकाणी लोकांना दुरून पाणी आणावे लागते, अशा ठिकाणी टँकर सुरू केले पाहिजेत. जरूरत पडेल त्याप्रमाणे विहिरी, कूपनलिका अधिगृहीत करण्याचीही गरज आहे. शिवाय, पाण्याचे प्रमाण जसजसे कमी होते, तसतसे स्रोत दूषित होऊ शकतात. अशावेळी पाणी पिण्यायोग्य आहे की नाही, हेही तपासण्याची गरज असते. तसेच, पिण्याचे पाणी वाहून नेणारे टँकरही स्वच्छ असले पाहिजेत, प्रत्येक टँकरवर जीपीएस यंत्रणा लावली पाहिजे, सरकारने या सूचना दिल्या असल्या तरी त्याची अंमलबजावणी महत्त्वाची.*

*जलसंपदा विभागाने दिलेल्या आकडेवारीनुसार, राज्यात १४ एप्रिलला एकूण क्षमतेच्या ४१ टक्के इतका पाणीसाठा होता. कोकण विभागात ४४ टक्के, पुणे ३० टक्के, नाशिक ४० टक्के, मराठवाडा ३५ टक्के, अमरावती ४५ टक्के आणि नागपूर ३७ टक्के असा पाण्याचा साठा आहे. मनमाडसारख्या ठिकाणी तर गेली कित्येक वर्षे १३ दिवसांआड पाणी येते. पिंपरी-चिंचवड या उद्योगनगरीत गेली सहा वर्षे एक दिवसाआड पाणी येते. सातारा जिल्ह्याच्या काही गावांत टंचाईच्या झळा जाणवू लागल्या आहेत. वास्तविक, गेल्या पावसाळ्यात राज्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला. तरीही गावोगावी पाणीटंचाई आहे; मग एखादवर्षी कमी पाऊस झाला, तर काय स्थिती होईल? विंधन विहिरींतून पाण्याचा अमर्याद उपसा होत असून, शहरांमधल्या झोपडपट्ट्यांमधूनही मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असते.*

*नळाच्या तोट्या उघड्या ठेवल्या जातात. पाईप फुटलेले असतात. पुण्यासारख्या शहरात चार धरणांत ३२ टक्के पाणीसाठा आहे. तो गेल्यावर्षीपेक्षाही जास्त असून, तरीही शहरात पालिकेचे तीन हजार आणि २९ हजार खासगी टँकर वस्त्यावस्त्यांत पाणीपुरवठा करत आहेत. वास्तविक, कोकणात भरपूर पाऊस पडतो; पण मुंबईच्या वेशीवर असलेल्या रायगड जिल्ह्यात पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. टंचाईची झळ बसू द्यायची नसेल, तर शिल्लक पाण्याचे उत्तम नियोजन आणि पाण्याचे समान वाटप धोरणाची प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली पाहिजे.महाराष्ट्रात साधारणपणे १,५०० पाणलोट आहेत. प्रत्येक पाणलोट २०० ते २५० चौरस किलोमीटरचा आहे. सर्व पाणलोटांत पडणार्या पावसाचे प्रमाण व तीव्रता निरनिराळी असून, ती मोजण्याची पूर्ण व्यवस्था नाही. तालुक्याच्या ठिकाणच्या पाणलोटांचीही शास्त्रशुद्ध व अद्ययावत माहिती उपलब्ध नाही. पाऊस किती पडला, बाष्पीभवनाने किती पाणी उडाले, जमिनीत पाऊस किती मुरला, भूपृष्ठावर किती पाणी साचले, याचा हिशेब आता मांडणे अपरिहार्य झाले आहे. शिवाय, पाणलोट विकास कार्यक्रमावर जो खर्च केला जातो, त्याचा प्रत्यक्षात कसा वापर झाला, त्यातून कोणते काम उभे राहिले, याचे गणितच मांडले जात नाही.*

*सरकारने सुरू केलेली 'जलयुक्त शिवार' योजना व्यापक प्रमाणावर राबवण्याची गरज आहे. अनेक ठिकाणी जलयुक्त शिवारांमुळे पाणीटंचाईची समस्या दूर झाली आहे. अनियमित व अवेळी पडणारा पाऊस, पाणी मुरण्यास अनुकूल नसलेली भूगर्भरचना, वृक्षतोड वा अन्य कारणांमुळे जमिनीवरच्या नष्ट झालेल्या आच्छादनामुळे पडणारे पाणी वेगाने वाहून जाते. अशा अनेक कारणांमुळे पाणीटंचाई होत आहे. आडगाव, कडवंची, राळेगणसिद्धी, गावडेवाडी, हिवरेबाजार, पळसखेड, दरेवाडी, पाटादेवी डोंगर यासारख्या पाणलोट क्षेत्र विकास साध्य करणार्या गावांमध्ये पाणीटंचाई नाही.*

*उलट तेथे आर्थिक समृद्धी आली आहे, याचीही नोंद घ्यावी लागेल. आपल्याकडे भूजलाचा उपसा प्रचंड झाला आहे. भूजल वाहते राहिल्यामुळे पूर्वी नदीला काही तरी पाणी यायचे. आता भूजलच आटल्यामुळे प्रवरा, गोदावरी, मुळा अशा सर्वच नद्या कोरड्या पडू लागल्या आहेत. यापुढे भूजल नियोजन व नियंत्रण यांचाही गंभीर्याने खोरेनिहाय विचार करावा लागेल. पाणी काटकसरीने कसे वापरावे, यासंबंधी शालेय वयापासून मुलांवर संस्कार झाले पाहिजेत. गावोगावी जाऊन जलसाक्षरता अभियान हाती घेतले पाहिजे. वाढत चाललेल्या टंचाईस्थितीत पाण्याची बचतच गरजेची आहे.*

# एक रुपयात पिक विमा बंद

## आता राज्यात अशी राबवली जाणार पिक विमा योजना



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती–** शेतकऱ्यांनी विमा हप्ता भरायचा आणि त्यात राज्य सरकार आपला आर्थिक सहभाग देऊन विमा कंपन्यांना रक्कम दिली जाईल, ही पूर्वी राज्यात असलेली पद्धत पुन्हा एकदा लागू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत घेतला आहे.

एक रुपयात पीक विम्याची गेली दोन वर्षे राज्यात सुरू असलेली योजना आता गुंडाळण्यात आली आहे. या योजनेत दोन वर्षात कोट्यवधी रुपयांचा घोटाळे झाल्याचे आरोप जिल्ह्याजिल्ह्यात झाले होते.हे घोटाळे कसे झाले याचे पुरावेही वेळोवेळी समोर मांडण्यात आले होते. त्यामुळे या योजनेवर सर्व स्तरांमधून टीका केली जात होती. शेतकरी वर्गातही नाराजी होती. त्यामुळे चौफेर टीकेनंतर योजना बंद करण्यात आली आहे.आता पीक विम्यापोटी संरक्षित विमा रकमेच्या दोन टक्के (खरिप पिकांसाठी), दीड टक्के (रब्बी पिकांसाठी) तर पाच टक्के (नगदी पिकांसाठी) असा हप्ता शेतकऱ्यांना भरावा लागणार आहे. पीक विमा योजना राबविण्यासाठी विमा कंपन्यांची नावे निविदेद्वारे निश्चित करण्यात येणार आहेत.पंतप्रधान पीक विमा योजनेंतर्गत राबविण्यात येणारी पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना ही आहे त्या स्वरुपातच चालू ठेवली जाईल, असा निर्णयदेखील मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

### योजना बंद केली; अनुदानाने दिलासा

एक रुपयात पीक विमा योजना बंद केली तरी सर्व जिल्ह्यांत आधुनिक व यांत्रिकी शेतीसाठी अनुदान देण्यात येणार आहे. त्यासाठी दरवर्षी पाच हजार कोटींचे अनुदान सरकार देईल व ते थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होईल. नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत सध्या असे अनुदान २१ जिल्ह्यांत १२ हजार गावांमधील शेतकऱ्यांना दिले जाणार आहे.''शेतकऱ्यांचा फायदा व्हावा यासाठी निर्णय घेतला. आम्ही चौकशीसाठी एसआयटी नेमली आहे. तिचा अहवाल आल्यानंतर कारवाई होईलच. – देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री''




## पोट साफ होत नाही, गॅसेस होतात? रात्री प्या एक चमचा ' हा ' काढा, सकाळी होईल पोट साफ

**दि.३० विदर्भ प्रजासत्ताक** गॅस, पचनक्रियेचा त्रास हल्ली अनेकांमध्ये पाहायला मिळत आहे. त्यात बद्धकोष्ठतेची समस्या सध्या वाढताना दिसत आहे.चुकीची जीवनशैली, अनियमित खाण्याच्या सवयी, ताणतणाव आणि फायबरच्या कमतरतेमुळे आपल्याला बद्धकोष्ठतेच्या समस्येचा सामना करावा लागतो.

सिडीटी- गॅसमुळे आपल्याला अस्वस्थता जाणवू लागते. सतत छातीत जळजळ होत राहाते. त्यामुळे कोणत्याही पदार्थ खाताना आपल्या अधिक विचार करावा लागतो.आयुर्वेदामध्ये बद्धकोष्ठता ही अनेक रोगांचे मूळ मानण्यात आली आहे. जर आपल्याला देखील वारंवार बद्धकोष्ठतेच्या समस्येला सामोरे जावे लागत असेल तर सोपा उपाय करुन पाहा.

प्रसिद्ध आयुर्वेदिक डॉक्टर सलीम झैदी यांनी त्यांच्या इंस्टाग्राम अकांऊटवरुन एक व्हिडिओ शेअर केला ते म्हणतात जर आपल्याला सतत बद्धकोष्ठतेचा त्रास होत असेल आणि नियमितपणे पोट साफ होत नसेल तर आयुर्वेदातील हा बहुगुणी काढा प्या. ज्यामुळे बद्धकोष्ठताच नाही तर आपली पचनसंस्था देखील मजबूत होईल.

आयुर्वेदात त्रिफळाला अधिक महत्त्व आहे. हे फळ तीन आयुर्वेदिक पदार्थांपासून बनलेले आहे. हिरडा, बहेडा आणि आवळा. या तिन्ही गोष्टी शरीराला डिटॉक्सिफाय करतात.



तसेच पोटात जमा झालेले विषारी पदार्थ हळूहळू काढून टाकतात. ज्यामुळे बद्धकोष्ठता तसेच गॅस, अपचन आणि आम्लता यांसारख्या समस्यांपासून आराम मिळतो.

तज्ज्ञ म्हणतात की, रात्री झोपण्यापूर्वी एक ग्लास पाण्यात १ चमचा त्रिफळा पावडर मिसळून प्यायल्याने पोट साफ होण्यास मदत होते. हा काढा आपण रात्री झोपण्यापूर्वी नियमितपणे प्यायल्याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतील. वारंवार औषधे खाल्ल्याने आपल्याला सिडीटीची समस्या उद्भवते. त्यासाठी आयुर्वेदातील हा प्रभावी उपाय करुन पाहा.

# आंबा फळांची काढणी करताना व काढणी केल्यानंतर काय खबरदारी घ्याल? जाणून घ्या सविस्तर

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक** आंबा फळाची काढणी आणि हाताळणी फार महत्त्वाची आहे. या प्रक्रियेत काही चुका झाल्या तर त्याचा परिणाम फळांवर होतो. यासाठी आंबा फळाची काढणी करताना उत्पादक शेतकऱ्यांनी काळजी घेतली पाहिजे.

आंबा फळ काढणी व्यवस्थापनपावसाची शक्यता लक्ष्यात घेता ज्या ठिकाणी आंबा फळे काढणीस तयार झालेली असतील अश्या ठिकाणी आंब्याची काढणी झेल्याच्या सहाय्याने देठासह चौदा आणे (८५ ते ९० टक्के) पक्वतेला करुन घ्यावी.

पाऊसामुळे आंबा फळावर करपा रोगाचे काळे डाग पडतात. अशावेळी फळांवर बुरशीनाशकांची फवारणी करणे आवश्यक आहे. बुरशीनाशकांची फवारणी न केल्यास काळे डाग वाढत जाऊन फळे पिकताना सडण्याची प्रक्रिया होऊ शकते. ज्या ठिकाणी आंबा काढणीकरीता १५ दिवस शिल्लक असतील अशा ठिकाणी करपा रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये याकरीता कार्बेन्डॅझीम या बुरशीनाशकाची १० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी याप्रमाणात फवारणी करावी.

दमट वातावरणामुळे काढणी केलेल्या आंबा फळावर फळकुज या रोगाचे प्रमाण वाढण्याची शक्यता असते, यामुळे फळे काढल्यानंतर फळांवर तपकिरी काळ्या रंगाचे चट्टे दिसुन फळे कुजतात आणि मोठ्या प्रमाणात नुकसान होते. फळकूज नियंत्रणासाठी फळे काढणीनंतर लगेचच ५० अंश सेल्सिअस च्या पाण्यात १० मिनीटे बुडवुन काढावीत (उष्ण जलप्रक्रिया). अशी फळे खोक्यात भरावीत अथवा पिकण्यासाठी आडीत ठेवावीत.

आंबा फळांची काढणी सकाळी लवकर किंवा संध्याकाळी उन्हाची तीव्रता कमी झाल्यावर करावी. उष्णतेमुळे फळांचे तापमान वाढून साक्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याने आंब्याची फळे काढल्यानंतर लगेचच सावलीमध्ये ठेवावीत. आंबा फळांची वाहतूक रात्रीच्या वेळेस करावी. आंबा वाहतुक भरदिवसा उन्हामध्ये वाहनांच्या टपावरुन करु नये.



विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष


शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०


आंबा फळावर फळमाशीचा प्रादुर्भाव दिसुन येण्याच्या शक्यता आहे. अश्या वेळी बागेमध्ये गळलेली फळे गोळा करुन नष्ट करावीत आणि आंबा फळांचे फळमाशीपासुन संरक्षण करण्यासाठी विद्यापीठाने शिफारस केलेले फळमाशी रक्षक सापळे प्रति एकरी २ याप्रमाणात बागेमध्ये झाडाच्या खालील बाजुच्या फाद्यांवर लावावेत.

आंबा फळांचे फळमाशी पासून तसेच प्रखर सूर्यकिरणांपासून संरक्षण करण्यासाठी तसेच फळांचा आकार व वजन वाढून डाग विरहीत फळांसाठी, गोटी ते अंडाकृती आकाराच्या आंबा फळांना डॉ.बा.सा.कॉ.कृ.विद्यापीठाने दिलेल्या शिफारशी नुसार २५ ु २० सें.मी. आकाराच्या कागदी/वर्तमानपत्रापासून बनविलेल्या पिशव्यांचे अवरण घालावे. आवरण घालताना फळाच्या देठाकडे इजा होणार नाही याची काळजी घ्यावी.

## जिल्हा प्रशासनाकडून अनुकंपाधारकांच्या यादीची घोषणा१५ दिवसात आक्षेप नोंदविण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताकदि.३०अमरावती,–** जिल्हा प्रशासनाने १ जानेवारी २०२४ आणि १ जानेवारी २०२५ रोजी गट-क आणि गट-ड पदांवर नियुक्तीसाठी अर्ज केलेल्या अनुकंपाधारक उमेदवारांची तात्पुरती सामायिक ज्येष्ठता यादी जाहीर केली आहे. या यादीवर १५ दिवसात आक्षेप नोंदवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.या यादीमध्ये जिल्हा परिषद, नगरपरिषद, महानगरपालिका, महामंडळे, प्राधिकरणे, व्यापारी उपक्रम आणि इतर तत्सम आस्थापनांवरील कर्मचाऱ्यांच्या नावांचा समावेश नाही. तसेच, यापूर्वी नियुक्ती मिळालेले, ४५ वर्षे पूर्ण झाल्याने अपात्र ठरलेले आणि इतर कारणांमुळे वगळण्यात आलेले उमेदवार आणि दुबार नोंदणी झालेली नावे वगळण्यात आली आहे. तात्पुरती सामायिक ज्येष्ठता यादी जिल्हाधिकारी कार्यालयाच्यारीरींरींळ.सीं.ळपवेबसाइटवर आणि जिल्हा नाझर, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या नोटीस बोर्डवर उपलब्ध आहे. यादीवर आक्षेप किंवा हरकती असल्यास १५ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# शिंगाडा पिकास फळे व भाजीपाला संवर्गातील कृषि पीक म्हणून मान्यता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती –** राज्यात पुर्व विदर्भातील शेतकऱ्यांकडून लहान लहान तलाव/बोड्या मध्ये मोठ्या प्रमाणात शिंगाड्याचे उत्पादन घेतले जाते. आयुर्वेदिक गुणधर्म असलेल्या शिंगाड्यापासून उच्च पोषणमुल्ये असणारे विविध उप पदार्थ बनविले जातात.

पारंपारिक धानशेती सोबत शिंगाडा लागवड केल्यास शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळण्यासोबतच ग्रामीण भागातील बेरोजगारीवर देखील मात करता येवू शकते.

तथापि शिंगाडा फळाचा कृषि पिकामध्ये समावेश नसल्याने शिंगाडा उत्पादक शेतकऱ्यांना इतर कृषि पिकांसाठी लागू असलेल्या योजनांचा लाभ होत नाही.सद्यःस्थितीत पणन विभागाने अधिसूचनेद्वारे 'शिंगाडा' याचा शेती उपजांचे कलम २(१-अ) खालील




अनुसूचीमध्ये समावेश केला आहे.

त्याचप्रमाणे डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांनी शिंगाडा पीकाचा फळे व भाजीपाला या पीकामध्ये समावेश करण्याचे अभिप्राय संदर्भ क्र. ५ अन्वये दिले आहेत.

या बाबीचा विचार करुन शिंगाड्याला फळे व भाजीपाला संवर्गातील कृषि पिक म्हणून मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.शिंगाडा पिकास 'फळे व भाजीपाला संवर्गातील कृषि पीक' म्हणून मान्यता देण्यात आल्याने शिंगाडा पिकास, इतर कृषि पिकांना अनुज्ञेय असलेल्या लाभ/सवलती प्राप्त होतील.त्यानुषंगाने सविस्तर मार्गदर्शक सूचना आयुक्त (कृषि) यांच्या स्तरावरुन निर्गमित करण्यात येतील.


आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. ३० एप्रिल २०२५

शहर/ग्रामिण


# शहरातील गुन्हेगारांना वठणीवर आणण्यासाठी सीपी नविनचंद्र रेड्डी फायर मोडवर

## मंगळवारी पुन्हा १२ पेक्षा जास्त गुंडांची पेशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती,**
क्राईम मिटींग व व्हीआयपींचा बंदोबस्त झाल्यानंतर सीपी नविनचंद्र रेड्डींनी शहरातील रेकार्डवरील व हिट्रीशीटर गुन्हेगारांची पेशी घेण्याचे सत्र पुन्हा सुरूकेले आहे. अशातच गुन्हेशाखेने २९ एप्रिल रोजी सीपी रेड्डींसमोर पुन्हा १२ पेक्षा जास्त गुंडांची पेशी केली. सर्व गुंडांचे अपडेअ बायोडाटा संगणीकृत केल्या जात आहे. तसेच रेकार्डवरील गुंडांना दररोज सकाळी संबधीत पोलिस ठाण्यात व्हिजीट देण्याचे सुचना देण्यात आले.शहरात गेल्या काही दिवसांपासून हत्याहत्येचा प्रयन, लुटमारी, ऑनरोड जबरी चोरी, गँगचालविणे, गैंगवार घडवून आणण्याचे गुन्हे मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे शहरातील गुन्हेगारांना वठणीवर आणण्यासाठी सीपी नविनचंद्र रेड्डी आता चांगलेच फायर मोडवर आले आहे. पोलिस आयुक्तांनी वसंत हॉलमध्ये आता शहरातील प्रत्येक पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रेकार्ड व हिट्रीशीटर आरोपींची पेशी घ्यायला सुरूवात केली आहे. तत्पूर्वी सीपींनी ठाणेदार, क्राईम पीआयची बैठक घेऊन तसे नियोजन व तयारी पूर्ण केली होती. विशेष म्हणजे सीपींच्या



पेशीच्या भितीने रेकार्डवरील रंगबाज गुंडांनी शहरातून पलायन सुध्दा केले आहे. तरी देखील स्थानिक पोलिस व गुन्हेशाखा रेकार्डवरील गुंडांना पकडून त्यांची सीपींसमारे पेशी करित आहे. आता पर्यंत शहरातील २२ गुन्हेगारांची सीपींसमोर पेशी झाली आहे. अशातच गुन्हेशाखेने आज वसंत हॉल येथे सीपी रेड्डींसमोर १२ पेक्षा जास्त गुंडांची पेशी केली. सर्व गुंडांचे अपडे अबायोडाटा संगणीकृत केल्या जात आहे. तसेच रेकार्डवरील गुंडांना दररोज सकाळी संबधीत पोलिस ठाण्यात व्हिजीट देण्याचे सुचना देण्यात आले. गुंडांच्या पेशी दरम्यान डीसीपी कल्पना बारवकर, सागर पाटील, गणेश शिंदे, गुन्हेशाखेचे एसीपी शिवाजी बचाटे, गुन्हेशाखेचे पीआय गोरखनाथ जाधव, बाबाराव अवचार, सीपी स्पेशल स्कॉडचे प्रमुख पीआय आसाराम चोरमलेसह आदि अनेक अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## महाराष्ट्र दिन शहर परेड मैदानावर साजरा होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि३०अमरावती–** महाराष्ट्र राज्याचा ६६वा स्थापना दिवस १ मे रोजी साजरा होणार आहे. यानिमित्त साजरा होणारा मुख्य शासकीय कार्यक्रम जवाहरलाल नेहरू स्टेडीयमऐवजी पोलिस मुख्यालयाच्या शहर परेड मैदानावर सकाळी ८ वाजता होणार आहे.महाराष्ट्र दिनाचा मुख्य शासकीय कार्यक्रम पोलीस मुख्यालय, अमरावती शहर



परेड मैदान येथे होणार आहे. यापूर्वी हा कार्यक्रम जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये आयोजित करण्यात येत होता. मात्र स्टेडियमवर ४०० मीटर रनिंग ट्रॅकचे काम सुरू असल्याने कार्यक्रमाच्या स्थळात बदल करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने स्टेडीयम कार्यक्रमासाठी योग्य नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे आता महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिवस पोलिस मुख्यालयाच्या परेड मैदानावर होणार आहे.

# धक्कादायक चिखलदरा तालुक्यात सिकलसेल ॲनिमिया चे १४६ रुग्ण

## आरोग्य विभागासोबत स्वयंसेवी संस्था लागल्या कामाला वेळीच नियंत्रणात आणण्यासाठी आरोग्य विभागाचे प्रयत्न सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मेळघाट** – अनेक वर्षांपासून कुपोषणासारख्या गंभीर – समस्येच्या विळख्यात असणाऱ्या मेळघाटात सिकलसेल ॲनिमिया हा आजार आदिवासी बांधवांना मोठ्या प्रमाणात जडतोय. जीवघेण्या या आजाराला वेळीच नियंत्रणात आणण्यासाठी आरोग्य विभागाचे प्रयत्न सुरू झाले आहेत. अशातच ऑर्गनायझेशन फॉर कुला ही स्वयंसेवी संस्था देखील आदिवासी बांधवांना या आजाराच्या त्रासापासून सुटका करण्यासाठी सरसावली आहे. दुर्गम गावांना भेट देणं, तिथं आरोग्य शिबिराच्यामध्यातून सिकलसेल ॲनिमियाचे रुग्ण शोधून त्यांना योग्य मार्गदर्शनाद्वारे मदतीसाठी स्वयंसेवीसंस्थेचं काम सुरू आहे.

(कलर बॉक्स)चिखलदरा तालुक्यात १४६ रुग्ण

चिखलदरा आणि धारणी या दोन तालुक्यात मेळघाट व्यापला आहे. यापैकी केवळ चिखलदरा तालुक्यात सिकलसेल ॲनिमिया या आजाराच्या रुग्णांची आरोग्य विभागानं केलेल्या तपासणीचा अहवाल समोर आला. त्यानुसार चिखलदरा तालुक्यात या आजाराचे एकूण १४६ रुग्ण आहेत. यापैकी एक ते पंधरा वर्षे वयोगटात एकूण ६५ बालकं सिकलसेल ॲनिमियां ग्रस्त आहेत. सोळाते ४० या वयोगटात एकूण ६१ रुग्ण आहेत.



### या गावात आहेत रुग्ण

चिखलदरा तालुक्यातील चिखलदरा या तालुक्याच्या ठिकाणीच एकूण सात सिकलसेल ॲनिमियाचे रुग्ण आहेत. यासोबतच तालुक्यातील वझ्झर, बिहाली, नागपूर, चुरणी, चिलाटी, नवलगाव, आलाडोह, कदम, सुमिता, जामली, बोरी, सलोना, भिरोजा, मेमना, शहापूर, जारीदा, मोथा, बेलखेडा, रामटेक, हतरु, सेमाडोह,तेलखार, भुलोरी, तरुबांदा, कनेरी,गौरखेडाबाजार, बामादेही, सोमवारखेडा, गंगारखेडा, बोरी, आडनदी, मारीता, काटकुंभ, भंडोरा, अंबापाटी, डोमा, सिमोरी, कोरडा, गिरगुटी, हिरडमल, केशरपूर, हतरु, दहेंद्री या गावात सिकलसेल ॲनिमिया रुग्ण आहेत.–

# २ मे ला शेतकरी कर्जमुक्तीसाठी भव्य ट्रॅक्टर मोर्चा

## खा. अरविंद सावंत यांची राहणार प्रमुख उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**
शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मागणीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे २ मे रोजी भव्य ट्रॅक्टर मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. हा मोर्चा सकाळी १० वाजता संत गाडगे महाराज मंदिर, गाडगे नगर येथून निघून जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. या आंदोलनात खासदार अरविंद सावंत, शिवसेनेचे आमदार, उपनेते, माजी खासदार, युवा सेना, महिला आघाडी, युवती सेना, कामगार सेना आणि सहकार सेनेचेपदाधिकारी सहभागी होणार आहेत. शिवसेना जिल्हाप्रमुख पराम गुडघे मनोज आणि नरेंद्र पडोळे यांनी अमरावती जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना या मोर्चात मोठ्या



संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. आपल्या हक्काच्या मागण्यांसाठी शेतकऱ्यांनी रखरखत्या उन्हात हजारो शेतकऱ्यांसह ट्रॅक्टर मोर्चा काढून शासनाच्या निद्रिस्त यंत्रणेला जाग करण्याचा निर्धार शिवसेनेने व्यक्त केला आहे. कर्जमुक्तीसाठी लढणाऱ्या शेतकऱ्यांच्या बाजूने शिवसेना ठामपणे उभी असल्याचे या आंदोलनातून सांगण्यात येत आहे.

# शासनाचा ऐतिहासिक निर्णयश्रीचक्रधर स्वामी यांचा 'अवतार दिन' साजरा करणार

## सामान्य प्रशासन विभागामार्फत परिपत्रक जारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**
महानुभाव पंथाचे प्रवर्तक आणि १२ व्या शतकातील थोर तत्त्वज्ञ, समाजसुधारक भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांचा भाद्रपद शुक्ल द्वितीया हा दिवस 'अवतार दिन' म्हणून साजरा करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने चर्चा केल्यावर सामान्य प्रशासन विभागामार्फत परिपत्रक जारी केले आहे. या निर्णयामुळे श्रीचक्रधर स्वामींच्या सत्य, अहिंसा, मानवतो आणि समानता या जागतिक मूल्यांचा गौरव होणार असून, त्यांच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार आणि जागर संपूर्ण विश्वभर होण्यास प्रोत्साहन मिळेल.परिपत्रकानुसार, मंत्रालयासह सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांमध्ये 'अवतार दिन' म्हणून साजरा केला जाईल. या दिवशी आयोजित होणाऱ्या कार्यक्रमांबाबत स्वतंत्र सूचना दिल्या जातील. या निर्णयामुळे श्रीचक्रधर स्वामींच्या मानवतावादी कार्याला आणि अलौकिक मराठी साहित्याला व्यापक व्यासपीठ मिळणार आहे. मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने चर्चा केल्यावर सामान्य प्रशासन विभागा मार्फत परिपत्रक जारी केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वी रिद्धपूर येथे मराठी भाषाविद्यापीठ, स्थापन केले. श्रीचक्रधर स्वामींच्या कार्याशी संबंधित पाच देवस्थानांच्या विकास आराखड्यांना मान्यता दिली होती.



विश्वाला प्रेरणा देणारा वारसाश्रीचक्रधर स्वामींचे तत्त्वज्ञान आणि कार्य कायम प्रेरणा देणारे आहे. त्यांचे कार्य विश्वाला प्रेरणा देणारा वारसा आहे. 'अवतारदिन' साजरा करण्याचा निर्णय केवळ एक उत्सव नसून, सत्य वमानवतेच्या मूल्यांचा जागर करण्याचा संकल्प आहे.**चंद्रशेखर बावनकुळे**
महसूलमंत्री व पालकमंत्री अमरावती, नागपूर.



# आर टी ओ च्या ढिसाळ नियोजनामुळे जिल्ह्यातील ५९९२ लाडक्या बहिणींची पडताळणी रखडली

## दोन महिन्यांपासून अहवाल अप्राप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**
चारचाकी वाहन असलेल्या५ हजार ९९२ लाडक्या बहिनींची यादी शासनाकडून महिलावबालविकास विभागाकडे दोन महिन्यांपुर्वीच प्राप्त झाली होती. याबाबत पडताळणीचे आदेश असताना या विभागाने ही यादी आरटीओ कार्यालयाकडे पडताळणीकरिता पाठविली होती. परंतु दोन महिने लोटले असताना अद्यापही या यादीची पडताळणी झाली नाही. याबाबत आरटीओ विभागाला दोनदा स्मरणपत्र दिल्याचे जिल्हा महिला बालविकास अधिकारी टकाळे यांनी सांगितले, राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या महत्वाकांक्षी योजनेला निवडणुकीपुर्वी सुरूवात झाली. याअंतर्गत महिलांना दरमहा १५०० रुपयांचे अनुदान दिले जाते. जिल्ह्यात सात लाखांवर याकरिता महिलांनी नोंदणी केली आणि त्यांना पात्र देखील करण्यात आले. त्यावेळी या योजनेचे नियम दिले असतानाही कोणत्याही प्रकारची पडताळणी न करता सरसकट अर्ज मंजुर करीत त्यांना लाभ सुरू केला आहे. मात्र आता शासनाकडून या यादीवर नियमांची कात्री



लावल्या जात आहे. अशातच दोन महिन्यांपुर्वी शासनांकडूनः ज्या लाभार्थ्यांकडे चारचाकी वाहनआहे, अशा ५९९२ महिलांची यादी महिला व बालविकास विभागाकडे पाठविली होती. या विभागाने यादीच्या पडताळणी करिता आरटीओ विभागाकडे यादी पाठविली. मात्र दोन महिने लोटले असताना यावर अद्यापही कोणताच अहवाल प्राप्त झाला नाही. महिला व बालविकास विभागाच्या मते याकरिता आरटीओ विभागाला दोनदा पत्र दिले आहेत. परंतु अद्यापही या विभागाकडून याची दखल घेतला नाही. त्यामुळे वाहनधारक लाडक्या बहिनींची पडताळणी रखडली आहे.

# जरीदा उपकेंद्रामुळे ५० गावांचा विजेचा प्रश्न सुटणार

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रयत्नाला यश

### *खासदार, आमदारांचे महत्त्वपूर्ण योगदान *वन विभागाच्या उच्चस्तरीय बैठकीत उपकेंद्राला मंजूरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती,**
वन विभागाची परवानगी प्रलंबित असल्याने काम पूर्ण होऊनही जारीदा वीज उपकेंद्र सुरू झाले नव्हते. महावितरणच्या ३३ केव्ही जारीदा (ता. चिखलदरा) उपकेंद्राला पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह खासदार डॉ. अनिल बोंडे, बळवंत वानखेडे आणि आमदार केवलराम काळे यांच्या विशेष प्रयत्नानंतर वन मंत्रालय आणि वन विभागाशी संबंधित उच्चस्तरीय बैठकीत मंजूरी मिळाली आहे.

त्यामुळे जरीदा आणि परिसरातील ५० गावांना सुरळीत वीज पुरवठा मिळणार आहे. तसेच त्यांच्या विजेशी संबंधित समस्यांचे कायमस्वरूपी निराकरणही होणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिली.

मेळघाटातील अतिदुर्गम व आदिवासीबहुल वन क्षेत्रामधील महावितरणच्या जारीदा वितरण केंद्रांतर्गत वीज पुरवठा होणाऱ्या ५० गावांना अखंडित आणि दर्जेदार वीज पुरवठा करण्यासाठी जिल्हा विकास निधीतील आदिवासी उपयोजनेअंतर्गत ९ कोटी ३३ लाख ९४ हजार खर्च करून जारीदा येथे नवीन ३३ केव्ही उपकेंद्र उभारण्यात आले आहे.

५ एमव्हीए क्षमता असलेल्या या उपकेंद्राला ३३ केव्ही वाहिनीव्दारे २२० केव्ही कोयलारी (मध्य प्रदेश) उपकेंद्रातून वीज पुरवठा करण्यात येणार आहे. उपकेंद्राचे काम ऑक्टोबर २०२३ ला पूर्ण झाले आहे. परंतु ३३ केव्ही उपकेंद्र व वाहिनीचा काही भाग वन्य जीव संरक्षण कायदा (FCA) आणि वन संरक्षण कायदा (FCA) अंतर्गत येत असल्याने मंजूरीकरीता प्रस्ताव वन खात्याकडे पाठविण्यात आले. त्यांनतर महावितरणसाबत जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्यामार्फतही नियमित आढावा आणि पाठपुरावा करण्यात आला.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार डॉ. अनिल बोंडे, बळवंत वानखेडे आणि आमदार केवलराम काळे हे लोकप्रतिनिधी मेळघाटातील दुर्गम, अतिदुर्गम भागातील आदिवासीबहुल भागांना सुरळीत आणि दर्जेदार वीज पुरवठा करण्यासंदर्भात कायम आग्रही राहीले आहे. त्यांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्यानंतर ३३ केव्ही जारीदा उपकेंद्राला राष्ट्रीय वन्य जीव बोर्डाच्या स्टँडींग कमिटीच्या बैठकीत दिल्ली येथे १२ मार्च २०२५ आणि पर्यावरण मंत्रालय सल्लागार समितीच्या दिल्ली येथील बैठकीत 'वन संरक्षण कायद्याअंतर्गत १६ एप्रिल २०२५ ला ३३ केव्ही जारीदा उपकेंद्राच्या प्रस्तावाला मंजूरी मिळाली आहे. त्यामुळे महावितरणच्या ३३ केव्ही जारीदा उपकेंद्र कार्यान्वित करण्यामधील मुख्य अडथळा दूर झाला आहे. वनविभागाकडून अंतिम परवानगी मिळताच जारीदा उपकेंद्र कार्यान्वित करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिली आहे.





# २ मेपासून शाळांना उन्हाळी सुटी तर १६ जूनपासून सुरू होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती–**
अमरावती: राज्याच्या शिक्षण विभागाकडून शाळांना उन्हाळी सुटी जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार २ मे पासून उन्हाळी सुटी सुरू होणार असून, पुढील शैक्षणिक वर्षात विदर्भ वगळता इतर सर्व विभागातील राज्य मंडळाच्या शाळा सोमवार १६ जूनपासून सुरू होणार आहेत.

प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी मंगळवारी या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले. राज्य मंडळाच्या प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांच्या उन्हाळी सुटीच्या कालावधीमध्ये एकवाक्यता, सुसंगती राहण्यासाठी उन्हाळी सुटी, शैक्षणिक वर्ष २०२५–२६ सुरू करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार राज्यातील शाळांना २ मेपासून उन्हाळी सुटी जाहीर करण्यात आली आहे. राज्यातील इतर मंडळांच्या शाळा वेळापत्रकानुसार सुरू असल्यास किंवा अशा शाळांमध्ये महत्त्वाचे शैक्षणिक उपक्रम राबवण्यात येत असल्यास विद्यार्थ्यांना सुटी जाहीर करण्याबाबत शाळा प्रशासनाने उचित निर्णय घेण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.पुढील शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये विदर्भ वगळता इतर सर्व विभागातील राज्य मंडळाच्या शाळा १६ जून २०२५ रोजी सुरू कराव्यात. जून महिन्यातील विदर्भातील तापमान विचारात घेऊन उन्हाळ्याच्या सुटीनंतर तेथील राज्य



मंडळाच्या शाळा सोमवार २३ जून ते २८ जून २०२५ पर्यंत सकाळ सत्रात ७.०० ते ११.४५ या वेळेत सुरू कराव्यात. सोमवार ३० जून पासून नियमित वेळेत शाळा सुरू करण्यात याव्यात, असे नमूद करण्यात आले आहे.

या सूचना सर्व विभागातील विभागीय शिक्षण उपसंचालक, जिल्हा परिषदांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

गेल्या वर्षी उन्हाळ्याच्या सुटीनंतर राज्यभरातील शाळा १५ जूनपासून सुरू झाल्या होत्या, तर विदर्भातील शाळांची पहिली घंटा मात्र १ जुलैला वाजली होती.

गेल्या वर्षी शैक्षणिक सत्र सुरु होत असताना सकाळी लवकर भरणाऱ्या शाळा आता ९ वाजता भरविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. विद्यार्थ्यांवर मानसिक ताण वाढू नये, तसेच विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी शालेय शिक्षण विभागामार्फत विविध निर्णय घेण्यात येतात.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राज्यातील शाळा आठवड्यातून एकदा म्हणजे शनिवारी दप्तराविना भरणार असे सांगण्यात आले होते. त्यामुळे पहिले ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शनिवारी दप्तर नेण्याची आवश्यकता उरली नव्हती. विद्यार्थ्यांचा विचार करीत २०२४–२५ या शैक्षणिक वर्षापासून धोरणात अनेक बदल करण्यात आले. यंदा कोणत्या नवीन सूचना देण्यात येतात, याची प्रतीक्षा आहे.

## पहेलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध व श्रद्धांजली म्हणून सुजान नागरिकाकडून कॅंडल मार्च

**दर्यापूर बनोसा बाभळी येथील बहुसंख्येने नागरिक सहभागी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०दर्यापूर–** भारताचे नंदन वंदन कश्मीर येथील पहलगाम येथे नुकत्याच झालेल्या दहशतवा द्याकडून पर्यटकावर प्राण घातक भ्याड हल्ला करण्यात आला ज्यामध्ये निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला या भ्याड हल्लूयामध्ये नेव्ही अधिकारी प्रशासनिक अधिकारी.व पर्यटक यांना आपला जीव गमावा लागला या भ्याड हल्ल्याचा निषेध व मृत्युमुखी पडलेल्या शहिदांना



श्रद्धांजली म्हणून दर्यापूर बनोसा बाभळी येथील सुजाण नागरिकातर्फे कॅंडल मार्च चे आयोजन करण्यात आले गौरक्षण चौक ते डॉ बाबासाहेब आंबेडकर पार्क पर्यंत कॅंडल मार्च मुख्य रस्त्यावरून शांततेत काढण्यात आला ज्यामध्ये सहभागी महिला पुरुषा नी.हातात मेणबत्त त्या.घेऊन निषेध दर्शविला डॉ बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे सर्वांनी मेणबत्त्या एकत्रित करून शहिदांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण केली असेच ज्या कुटुंबावर आघात घडला त्यांना सावरण्याची शक्ती प्रधान करण्याची प्रार्थना करण्यात आली कॅंडल मार्चमध्ये बहुसंख्येने नागरिक.व पत्रकार सहभागी झाले मार्च करिता दर्यापूर पोलीस प्रशासनाकडून चोख व्यवस्था ठेवण्यात आली भारत माता की जय भारत माता की जय या घोषणांनी समारोप करण्यात आला.–

## गोमांस वाहून नेणारा टेम्पो पकडला

### अंजनगावसुर्जी–परतवाडा मार्गावर पोलिसांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती–** अंजनगांव येथून परतवाडा मार्गावर सकाळी ९ वाजता चार किंटल गोमांस घेऊन जाणारा टेम्पो पोलिसांनी पकडून जप्त केला. नविन स्टॅण्ड येथे परतवाडाकडे जाणाऱ्या महामार्गावर ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांनी एका व्यक्तीस अटक केली.अब्दुल गफुर अब्दुल रहीम (वय ३६, रा. कुरेशनगर, सुर्जी अंजनगाव) असे अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे. याबाबत पोलीस हवालदार जयसिंगचव्हाण यांच्या फिर्यादीवरून महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमांतर्गत विविध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पहलगाम येथे झालेल्या हल्ल्याविरोधात विविधसंघटनांकडून अंजनगाव सुर्जी बंद पुकारण्यात आलेला होता. बंदचा फायदा घेत गोमांस भरलेला एक टेम्पो परतवाडाकडे निघाल्याची माहितीपोलिसांना खबऱ्यामार्फत मिळाली होती. पोलिसांनी नवीन बसस्थानक परीसरातील महामार्गावर सापळा रचला. संशयित टाटा एस टेम्पो एम.एच.०४एफयु / २३५२ हा पोलिसांच्या पथकाने अडवला. पाहणीदरम्यान टेम्पोत चार किंटल गोमांस आढळले. अ. गफुर अ. रहीम याला भारतीय न्याय संहितेच्या कलम ५, (५ ब,क) ९ (९क) प्राणी संरक्षण अधिनीयम २०१५ अन्वये अटक करण्यात आली. टेम्पोसह । गोमांस असा ३,८०,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. अ. गफूर अ. रहीम याला न्यायालयाने एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. ही कारवाई हवालदार जयसिंग चव्हाण, आकाश रंगारी, प्रमोद चव्हाण, रवि राठोड यांच्या पथकाने केली

# जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापकांच्या निरोप समारंभाला सारे गाव चावडीवर

## गावकऱ्यांनी केला नागरी सत्कार; शिक्षकांनी दिले गावजेवन

### विद्यार्थ्यांसमवेत पालकांचे अश्रू अनावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०दर्यापूर –** आजच्या कॉन्व्हेन्ट संस्कृतीमुळे जिल्हा परिषद शाळा बंद पडण्याच्या मार्गावर असताना तालुक्यातील तोंगलाबाद येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तालुक्यातील गुणवत्ता प्राप्त प्रथम क्रमांकाची व जिल्हातील आयएसओ नामांकन प्राप्त शाळा म्हणून ज्यांनी १२ वर्षापासून नावारूपास आणली असे मुख्याध्यापक नंदकिशोर रायबोले यांचे बदली झाल्यामुळे त्यांच्या कार्याची पावती म्हणून त्यांचा जिल्हा परिषद शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने नागरी सत्कार आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून ग्राम पंचायत सरपंच सौ.वैशाली निरंजन पानझाडे,प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समिती केंद्रप्रमुख रवींद्र राठोड, दर्यापूरचे समाजसेवक रामूशेठ मालपाणी,युवक काँग्रेसचे महासचिव इंजि.नितेश वानखडे,समाजसेवक प्रा रघुनाथराव इंगळे,ज्येष्ठ पत्रकार गजाननराव देशमुख,माजी केंद्रप्रमुख देवानंद बोबटे,राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य कु.वर्षा काळपांडे,प्रा डॉ देवालाल आठवले,उपसरपंच सुभाषराव जऊळकार,माजी सरपंच रामहरी राऊत,जय बजरंग व्यायाम शाळेचे व्यवस्थापक श्रीरामभाऊ जऊळकार, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष रंगराव जळमकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनीष बावणेर, सत्कारमूर्ती, नंदकिशोर रायबोले यांचे आई–



वडील,पत्नी ज्योती रायबोले आदी उपस्थित होते.यावेळी मुख्याध्यापक नंदकिशोर रायबोले यांचा वाढदिवस असल्याने त्यांचा व्यवस्थापन समितीचे सदस्य, ग्राम पंचायत कार्यालय, जिजामाता अंगणवाडी,स्व.ल. पा.जऊळकार स्मृती सार्वजनिक वाचनालय,जय बजरंग व्यायाम शाळा,युवा यात्रा महोत्सव समिती, श्री पांडुरंग हरी आश्रम व स्नेहीगण आणि मित्र परिवार यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.तसेच वर्ग ४ च्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. त्याप्रसंगी त्यांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी प्रा.रघुनाथराव इंगळे,डॉ देवानंद बोबटे, इंजि.नितेश वानखडे,रामहरी राऊत,एकनाथ बुंदे,स्वरीत वाघमारे, धनश्री काळदाते यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना नंदकिशोर रायबोले यांनी सर्वांचे आभार मानत १२ वर्ष गावकऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल आभार व्यक्त केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या सहायक शिक्षिका तेजस्विनी अटाळकर यांनी केले तर संचलन शाळेचे शिक्षण तज्ञ प्रा धनंजय देशमुख व आभार प्रदर्शन डॉ गोपाल जऊळकार यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी,पालक,शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, ग्राम पंचायत कार्यालय, जिजामाता अंगणवाडी,स्व.ल. पा.जऊळकार स्मृती सार्वजनिक वाचनालय,जय बजरंग व्यायाम शाळा,युवा यात्रा महोत्सव समिती,श्री संत हनुमान महाराज संस्थान व गावकरी मंडळी यांनी मोलाचे सहकार्य केले.यावेळी तालुक्यातील पंचायत समितीचे शिक्षक वर्ग व मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.या गावच्या कौंटुबिक सोहळ्याला संपूर्ण गाव एकत्र आले होते.या भावनिक कार्यक्रमाने नंदकिशोर रायबोले व त्यांचे पत्नी आणि आईवडील भारावून गेले होते.याप्रसंगी विद्यार्थ्यांसमवेत पालकांचे अश्रू अनावर झाले होते.स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## नागपुरात २ ते ५ मे दरम्यान होणार आंबा, मिलेट व धान्य महोत्सव

### कृषि पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयातर्फे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नागपूर–** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयाच्या वतीने आंबा, मिलेट व धान्य महोत्सव २०२५ चे आयोजन शुक्रवारी २ मे ते ५ मे २०२५ दरम्यान कुसूमताई वानखेडे भवन, नागपूर येथे करण्यात आले आहे. या महोत्सवात कोकणातील हापूस, पायरी, दशहरी तसेच गडचिरोलीसारख्या भागातील स्थानिक आंब्यांची थेट विक्री होणार आहे.

विदर्भ व महाराष्ट्रातील विविध भागांतील मिलेट व धान्य उत्पादक आपल्या शेतमालाची कोणत्याही मध्यस्थाविना थेट ग्राहकांना विक्री



करणार आहेत. महोत्सवामध्ये सर्व प्रकारचे मिलेट्स जसे, ज्वारी, नाचणी, बाजरी, वरई, सावा, भगर, कुटकी. राळा उपलब्ध राहील. या मिलेट्सचे प्रक्रियायुक्त पदार्थ जसे नाचणी बिस्कीट, नाचणी पापड, ज्वारीच्या लाह्या, रोस्टेड ज्वारी, बाजरा, इडली मिक्स, कुटकिचे लाडु असे अनेक प्रक्रियायुक्त पदार्थ मोठ्या प्रमाणात नागपूरकरांना उपलब्ध होणार आहे. , सुमारे ५० ते ५५ स्टॉल्स उपलब्ध असतील. ग्राहकांना अस्सल हापूस आंब्याची ओळख व खात्री यामुळे मिळणार आहे. शुकव्रारी सकाळी १० वाजता महोत्सवाला सुरुवात होईल. इतर दिवशी महोत्सवाची वेळ सकाळी ९ ते रात्री ९ असे राहील. नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन राज्य कृषि पणन मंडळाच्या विभागिय कार्यालयाचे उपसरव्यवस्थापक अजय कडू यांनी केले आहे.

## वडेट्टीवार यांची पुन्हा टीका, म्हणाले, धर्म विचारून गोळीबार हे सरकारचे अपयश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नागपूर–**
दहशतवाद्यांनी पहिल्यांदाच काश्मीरात धर्म विचारून गोळीबार केला. सरकार आपले अपयश लपवण्यासाठी यासंदर्भातील माझे वक्तव्यांची मोडतोड करून मांडणी करीत आहे, असा आरोप काँग्रेसचे विधीमंडळ पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी आज नागपूर विमानतळावर माध्यम प्रतिनिधीशी बोलताना केला.

वडेट्टीवार यांच्या वक्तव्याने सोमवारी वादळ उठले होते. भाजपचे मंत्री नितेश राणे यांनी त्यांच्यावर टीका केली होती. त्याकडे वडेट्टीवार यांचे लक्ष वेधण्यात आले असता ते म्हणाले, नितेश राणे यांनी काय म्हटले. त्याकडे मला लक्ष देण्याची गरज नाही. काल मी जे बोललो ते मोडून तोडून दाखवण्यात आले. भारताला आपापसात लढवण्याचे षड्यंत्र पाकिस्ताने रचले आहे. देशांमध्ये कट कारस्थान रचण्याचा प्रयत्न केला जात आहे. आमची भूमिका स्पष्ट आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी जी भूमिका मांडली ती आमच्या पक्षाची भूमिका आहे.काल मी म्हणलो की, दहशतवाद्यांना पहिल्यांदा एवढा वेळ मिळाला, त्यांनी धर्म विचारून गोळीबार केला. तेवढेच दाखवण्यात येते आहे. वृत्त वाहिन्यांनी माझे संपूर्ण वक्तव्य दाखले पाहिजे. पाकिस्तानने दहशतवद्यांना शिकवून पाठवले आहे. देशात यादवी व्हावी म्हणून धर्म विचारून पर्यटकांना मारण्यात आले.

देशाच्या सार्वभौमतेला, अखंडतेला खिंडार पाडण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्यामुळे त्यांनी असा कट रचला. अतिरेक्याला कुठला धर्म नसतो असे मी म्हटले आहे. हा भारताला कमजोर करण्यासाठी हल्ला होता. २६ वर्षानंतर पर्यटकांवर झालेला हल्ला आहे हे अपयश लपवण्यासाठी माझे बोलणे मोडून–तोडून दाखवले गेले, असा आरोपी वडेट्टीवार यांनी केला.

## आझाद समाज पार्टीच्या प्रदेश उपाध्यक्षांचे रिव्हॉल्व्हरसह ८ काडतूस चोरणाऱ्यास २४ तासात अटक

### कारमधून ऑफीसची चाबी काढून शिताफीने चोरली होती रिव्हॉल्व्हर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**
फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यातील डिबीस्कॉडने आझाद समाज पार्टीचे महाराष्ट्राचे प्रदेश उपाध्यांच्या कार्यालयातून त्यांचे रिव्हॉल्व्हर व ८ जिवंत काडतूस लोड असलेली मॅक्झीन चोरणाऱ्या चोरट्याला २४ तासात अटक केली. पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून १ लाख ३० हजार रूपये किमतीचे रिव्हॉल्व्हर, ८ काडतुस जप्त केले. पोलिसांनीही सुपरफास्ट कारवाई केल्याने आरोपीकडून रिव्हॉल्व्हरचा होणारा संभाव्य गैरवापर टळला.अक्षय गोपाल वासनिक (१९) रा. गजानन नगर, अशोक वाटीका, अमरावतीअसे अटकेतील आरोपीचे नाव आहे. तर तक्रारकर्त्यांचे नाव मनिष पुडलीकराव साठे (४७) रा. फॉरेस्ट कॅलनी, जुना बायपास, अमरावती असे आहे. माहितीनुसार, मनीष साठे हे आझाद समाज पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष असून त्यांचा कंट्रक्शनचा व्यवसाय आहे.मनीष साठे यांच्याकडे शासकीय परवाना असलेले ३२ एनपी बोअरची रिव्हॉल्व्हर आहे. मनीष साठे रिव्हॉव्हरमध्ये ८ काडतुस लोड असलेली मॅक्झीन ठेवत होते. मनीष साठे यांचे फॉरेस्ट कॉलनीत कार्यालयात आहे. ते दररोज त्यांच्या एमएच–३२–एसी–०५८५ क्रमांकाच्या फॉच्युनर वाहनाने कार्यालयात ये–जा करतात. तसेच कार्यालयाची चाबी वाहनाच्या ड्रायव्हर साईडच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवत असतात. अशातच आज २९ एप्रिल रोजी सकाळी अज्ञात चोरट्याने मनीष साठे यांच्या कारमधून त्यांच्या कार्यालयाची चाबी घेतली आणि कार्यालयातून ८ जिवंत काडतूसच्या मॅक्झीननेलोड असलेली रिव्हॉल्व्हरचोरली. मनीष साठेंनी याबाबत फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात तक्रार देताच चांगलीच खळबळ उडाली. ८ काडतुसचा चोरट्याकडून गैरवापर होऊ नये म्हणूनफ्रेजरपुरा पोलिस ठाण्याचे प्रभारी ठाणेदार पीआय निलेश गावंडे यांनी पीएसआय राहुल महाजन, डीबीस्कॉडचे प्रमुख हेड कॉस्टेबल योगेश श्रीवास, सचिन पवार, हरिष बदले, शशिकांत गवई, हरिष चौधरी, रोशन वऱ्हाडे, जयेश परिवाले, दिनेश नेमाडे यांच्यासह मिळून युध्दपातळीवर गोपनीय व तांत्रिक पध्दतीने तपास सुरू केला. दरम्यान घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज, फुटेजमधील आरोपीचे वर्णन, गोपनीय माहिती व्दारे ही चोरीरेकार्डवरील हिट्रीशीटर आरोपी अक्षय वासनिक याने केली असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार पोलिसांनी युध्दपातळीवर शोधमोहिम राबवून अक्षय वासनिकला अटक केली. तसेच त्याच्या ताब्यातूनमनीषसाठेयांची ८ जिवंत काडतुसच्या मॅक्झीनने लोड असलेली रिव्हॉव्हर जप्त केली. फ्रेजरपुरा पोलिसांनी ही सुपरफास्ट कारवाई केल्याने आरोपी अक्षय वासनिककडून रिव्हॉल्व्हरचा होणारा संभाव्य गैरवापर टळला. अन्यथा मोठी जिवित हानी झाली असती.

# भाजपा नेत्या व भाजपा स्टारप्रचारक मा.खा.सौ.नवनित राणा यांच्या हस्ते २७ विद्यार्थी व विद्यार्थीनींना सायकलीचे वाटप

## आ.रवि राणा यांची विशेष उपस्थिती



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

गरजु व होतकरु विद्यार्थ्यांना नेहमीच शैक्षणीक मदत भाजपा नेत्या व भाजपा स्टार प्रचारक मा.खा.सौ.सौ.नवनित रवि राणा व आमदार रवि राणा करीत असतात. त्या अनुषंगाने दरवर्षी प्रमाणे आ.रवि राणा यांचा वाढदिवस नव्हे जनसेवा दिवस म्हणुन साजरा करण्यात असून त्यांचेच औचित्य साधुन भाजपा नेत्या मा.खा.सौ.सौ.नवनित राणा यांनी गंगा सावित्री निवासस्थानी अंश शंकर धनगावकर रा.अंजनगाव बारी , कृष्णा राहुल बोधडे रा, राजापेठ हा वर्ग ०५ वि मध्ये शिक्षण शिकत असून त्यांचे वडील हात मजुरी करीत असतात तर सार्थक अजय माहेकर हा कपिल वस्तु नगर अमरावती येथील रहिवासी असून तो वर्ग ०७ वि मध्ये शिक्षण घेत असून कुटुंबाची आर्थीक परिस्थिती अतीशय गरीबीची असल्याने त्यांना दोनचाकी सायकल देण्यात आलेली आहे. यांच्यासह विविध ठिकाणच्या २७ विद्यार्थ्यांना दोन चाकी सायकलचे वाटप केले. व भविष्यातील वाटचालीकरीता शुभेच्छा सुध्दा दिल्या. त्यामुळे गोर गरीबांची जाणीव ठेवणारे भाजपा नेत्या मा.खा.सौ.नवनित रवि राणा व आमदार रवि राणा यांचे उपस्थितीत विद्यार्थ्याच्या कुटुंबाने आभार व्यक्त केले.

# पं. स.भातकुली अंतर्गत दर्जेदार व्हिडीओ निर्मिती व मुख्यमंत्री माझी सूंदर शाळा सन्मान सोहळा उत्साहात संपन्न

## शैक्षणिक उपक्रमात सर्व शिक्षकांनी सहभागी व्हावे-दिपक कोकतरे गटशिक्षणाधिकारी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

पं. स.भातकुली शिक्षण विभागाच्या वतीने दर्जेदार व्हिडीओ निर्मिती स्पर्धा व मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्याचे आयोजन पं. स.भातकुली सभागृहात करण्यात आले होते. आद्यशिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून व प्रतिमेला हारार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून दिपकजी कोकतरे गटशिक्षणाधिकारी, पं. स.भातकुली उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून तुषारजी दांडगे गटविकास अधिकारी,प्रविनजी वानखेडे सहा.गटविकास अधिकारी,नरेंद्रजी गायकवाड ,अधिक्षक, शालेय पोषण आहार पंजाबराव पवार शिक्षण विस्तार अधिकारी,वसंतजी लोहेकर केंद्रप्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमा अंतर्गत मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा या उपक्रमाअंतर्गत जि.प.पूर्व माध्य मराठी शाळा आसरा,जि.प.पूर्व माध्य मराठी शाळा वायगाव, जि.प.पूर्व माध्य उर्दू शाळा टाकरखेडा, आदर्श इंग्लिश प्रायमरी स्कूल भातकुली,राष्ट्रीय शेतकी विद्यालय खोलापूर, विनायक इंग्लिश प्रायमरी स्कूल पूर्णानगर या शाळांचे मुख्याध्यापक व सर्व सहकारी शिक्षक शिक्षिका यांचा शाल,मोमेंटो,प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मान व सत्कार करण्यात आला.दर्जेदार व्हिडीओ निर्मिती स्पर्धा या उपक्रमाअंतर्गत लखनसिंग जाधव,शैलेंद्र स.दहातोंडे, सोनाली येवले,दिपाली बाभुळकर,मो. शफीक मो.मुश्ताक अहमद,स्वाती यावले,श्याम चौकडे, सुवर्णा घाटेकर,समीना परवीन मोहम्मद अलीम,उषा धुर्वे,शैलेश मांदळे, प्रतीक्षा मोहोड,दिलीप कुमरे, संगीता लोहेकर,पंकज दहिकर,दिनेश लांडगे या विजेत्या स्पर्धकांना मोमेंटो, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देवून सर्वांचा सन्मान व सत्कार करण्यात आला. अशा प्रकारच्या उपक्रमामध्ये सर्वच शिक्षकांनी सहभागी होण्याचे आवाहन गटशिक्षणाधिकारी दिपकजी कोकतरे साहेबांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मिनाक्षी खरटमोल मॅडम (विषय तज्ञ पं. स.भातकुली) यांनी केले तर कार्यक्रमाचे संचालन शैलेंद्र स.दहातोंडे यांनी तर आभार प्रदर्शन सुजाता सोनवणे मॅडम (विषय तज्ञ,पं. स.भातकुली यांनी केले.

# चला जाऊ या ग्राम जयंती साजरी करूया : या अभियानाची सांगता



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०तिवसा**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ११६ ग्राम जयंतीनिमित्त भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रम मोझरी द्वारा संचालित केंद्रीय प्रचार विभाग अंतर्गत तालुका प्रचार विभाग तिवसाच्या वतीने चला जाऊया या ग्रामजयंती साजरी करूया या अभियानाची सुरुवात फत्तेपूर जावरा येथून ०७ एप्रिल रोजी सुरुवात झाली. मागील सात वर्षापासून ही अभियान तालुकाभर यशस्वीरित्या राबवण्यात जात आहे. ३० एप्रिल हा दिवस राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा जन्मदिवस ग्राम जयंती म्हणून संपूर्ण भारत वर्षामध्ये मोठ्या उत्साहात साजरा होत असतो. या अभियानाचा मारडा येथे समारोप करण्यात आला.


सर्वप्रथम वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शेकडो गुरुदेव भक्तांसह ग्रामस्थांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एकनाथ महाराज गावत्रे तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच रविना अंभोरे, गोपाल कडू, सुहास टप्पे, पंढरीनाथ जिरापुरे, दौलत धुर्वे, दोंडगे, गणेश राव घाटोल, सुभाषराव सोनारे, पोलीस पाटील सुधाकर पाटील, सरपंच मुकूंद पुनसे, किशोर आगर, बबिता पालिवाल आदी उपस्थित होते.यावेळी संपूर्ण मोहिमेमध्ये स्वयम् प्रेरणेने सहभागी झालेले आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन सुभाष सोनारे यांनी तर प्रास्ताविक गणेश घाटोळ यांनी केले. आभार संजय टेकाडे यांनी मानले.

# तळवेल येथे हजारो भक्तांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

## मारोती महाराज मंदिर स्थापना निमित्य आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०तळवेल**

तळवेल येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा मारोती महाराज मंदिरामध्ये स्थापनादिनानिमित्या महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असते. यामध्ये तीर्थस्थापना, भजने, कीर्तने, महाप्रसाद अशा अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सोमवारी सकाळी महारांचा अभिषेक व तीर्थस्थापना करण्यात आली सायंकाळी ग्रामप्रदक्षिणा काढण्यात आली यामध्ये बेलोरा येथील वारकरी भजन मंडळी व पांचक्रोशीतील भजन मंडळांचा सहभाग नोंदवीला काल सायंकाळी तळवेल परिसरातील हजारो भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. चांदूरबाजार तालुक्यातील तळवेल येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा मारोती महाराज संस्थान येथे 'श्रीं'ची मूर्ती स्थापन निमित्त महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते सोमवार ला महोत्सवाची सुरुवात झाली असून सकाळी तीर्थस्थापना



झाली व सायंकाळी ग्राम मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पांचक्रोशीतील भजन वारकरी मंडळी व बेलोरा येथील भजन मंडळी यांनी सहभाग घेतला व काल सायंकाळी ७ वाजतापासून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते . यामध्ये गावाकरी व पाचक्रोशीतील हजारो भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला महाप्रसादाचे आयोजन पुरुषांसाठी शंकर विद्यालयाचे प्रांगण व महिलांसाठी हनुमान मंदिर प्रांगण येथे करण्यात आले होते अतिशय शिस्तप्रिय प्रद्धतीने कारेक्रम पार पडला सर्वत्र भक्तिमय वातावरण तयार झाले होते गावाकर्यांनी समाधान व्यक्त केले.

# उद्याला संत सावजी महाराज पुतळ्याचे अनावरण व शववाहीकेचे लोकार्पण

## अखिल भारतीय साव कलाल समाजाचा उपक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

सामाजिक उपक्रमात अग्रेसर आणि समाजाच्या विकासासाठी कटिबद्ध असलेल्या अखिल भारतीय साव कलाल समाज समितीतर्फे येत्या १ मे रोजी संत सावजी महाराज पुतळ्याचे अनावरण व शववाहीकेचा लोकार्पण सोहळा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे . सावकालाल समाजाने घेतलेल्या निर्णयानुसार अमरावती येथील हिंदू स्मशानभूमीत समाजाचे आराध्य दैवत श्री संत सावजी महाराज यांचा पुतळा उभारण्यात आला असून या पुतळ्याचे अनावरण १ मे रोजी सकाळी १० वाजता अखिल भारतीय साव कलाल समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवसेना नेते सुनील खराटे यांच्या हस्ते होणार आहे. यासोबतच अखिल भारतीय साव कलाल समाजाकडून सामाजिक दायित्वाचा भाग म्हणून तयार करण्यात आलेल्या



शववाहीकेचे लोकार्पण देखील याच कार्यक्रमात करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला अखिल भारतीय साव कलाल समाजाचे राष्ट्रीय सचिव युवा उद्योजक अमोल चवणे, सुनील राऊत,कोषाध्यक्ष सचिन पहाडे, प्रसिद्धी प्रमुख सुरेंद्र जयस्वाल, साव कलाल समाजाचे अमरावती जिल्हाध्यक्ष गजानन कोल्हटकर, कार्याध्यक्ष नितीन कोल्हटकर,महिला आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनिता बावनेर, सचिव योगिता शंकरपुरे, कोषाध्यक्ष सीमा पिलागडे, उपाध्यक्ष कविता बोरकर आदी मान्यवरांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती राहणार आहे.या कार्यक्रमास समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन अखिल भारतीय साव कलाल समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनील खराटे, राष्ट्रीय सचिव अमोल चवणे व सुनील राऊत यांनी केले आहे.

# संगाबा विद्यापीठातील एमबीए विभागाच्या ४२ विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांमध्ये निवड

## यशाबद्दल विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील व्यवसाय प्रशासन आणि व्यवस्थापन विभागातील (एमबीए) ४२ विद्यार्थ्यांची विविध क्षेत्रातील नामांकित संस्था व कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. सहा विद्यार्थी डी-मार्टमध्ये, एक विद्यार्थी लर्निंग रुट्स प्रा. लि.मध्ये, याव्यतिरिक्त सहा विद्यार्थी इसाफ स्मॉल फायनान्स बँकेत, दोन विद्यार्थी एसबीआय इन्शुरन्समध्ये, दोन जस्ट डायलमध्ये, एक इंडिया मार्टमध्ये, दोन निवा बुपा हेल्थ इन्शुरन्समध्ये, तीन श्रीराम फायनान्समध्ये, तिघे बुस्टनाऊ, तीन एअरटेलमध्ये, तीन सालासर स्टीलमध्ये, आठ विद्यार्थी एलिगन्स एंटरप्राईज, एक पब-लर्न व एका विद्यार्थ्याला एचडीएफसी ॲग्रो इन्शुरन्समध्ये नियुक्ती मिळाली आहे. या यशाबद्दल विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

ईएसएएफ कंपनीत शुभम इंदुरकर, श्रुती पटालिया, दीपाली देशमुख, प्राप्ती चौधरी, रोहित उपाध्याय, वैष्णवी झोपाटे, डी-मार्टमध्ये शुभम इंदुरकर, कपिल भेंडे, जयश्री अमोडे, माधुरी अघम, मृणाल पिसाळ, प्राप्ती चौधरी, लर्निंग राऊट्समध्ये दीपाली देशमुख, निवा बुपा हेल्थ इन्शुरन्समध्ये श्रुती तायवाडे, सरिता वानखेडे, एअरटेल कंपनीमध्ये दीपाली देशमुख, श्रुती तायवाडे, बुस्ट नाऊ कंपनीमध्ये रुमान शेख, आचल ठाकरे, विशाल निंभाळकर, पब-लर्न कंपनीमध्ये श्रुती तायवाडे, सालासर अलोय अँड स्टील इंडस्ट्रीज प्रा. लि. मध्ये विशाल निंभाळकर, सुमित जुंबळे, सरिता वानखेडे, श्रीराम फायनान्समध्ये सुयोग महल्ले, गजानन सूर्यकर, भावेश चांदुरे, एसबीआय लाईफ इन्शुरन्समध्ये शुभम इंदूरकर, कपिल भेंडे, एलिगन्स एन्टरप्रायजेसमध्ये अर्पिता सूर्यवंशी, रोहित उपाध्याय, अभिषेक बनकर, सुमित जुंबळे, सरिता वानखेडे, शिवानंद येवले, विशाल निंभाळकर, आचल ठाकरे या विद्यार्थ्यांना नोकरी मिळाली आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात विविध करिअर संधी शोधणे आणि उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम करण्यात एमबीए विभाग महत्त्वाची भूमिका बजावत आहे. याची विशेष दखल घेत कुलगुरू डॉ. मिलिंद बाराहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी विद्यार्थी तसेच व्यवसाय प्रशासन आणि व्यवस्थापन विभागाचे कॉर्पोरेट जगासाठी मार्गदर्शन यासाठी अभिनंदन केले. कठोर शैक्षणिक कार्यक्रम, प्लेसमेंटपूर्व प्रशिक्षण आणि मजबूत उद्योग सहकार्य यामुळे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आपल्या विद्यार्थ्यांना आजच्या स्पर्धात्मक कॉर्पोरेट जगात भरभराटीसाठी आवश्यक ती कौशल्ये आणि ज्ञान देऊन सक्षम करत आहे. सर्व विद्यार्थ्यांचे यापुढेही जास्तीत जास्त प्लेसमेंट होणार असल्याचे सांगून एमबीए विभाग प्रमुख डॉ. दीपक चाचरकर यांनी अभिनंदन केले.

# वर्षभरात दोन लाख शेतकरी कर्जासाठी सावकाराच्या दारी पोहचले

## २५५ कोटींचे कर्जवाटप, अनधिकृत सावकारांचे कर्ज शेकडो कोटींच्या घरात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

शेती बेभरवशाची झाल्याने वर्षभरात ९६ हजार शेतकऱ्यांना सावकाराच्या दाराचे उबंरठे झिजवावे लागले. यामध्ये मार्चअखेर ६३५ परवानाधारक सावकारांनी १,९१,२७१ शेतकऱ्यांसह आर्थिक अडचणीतील नागरिकांना २५४०८.५३ कोटींचे कर्जवाटप केले आहे. शिवाय हजारो अवैध सावकारांनी मनमानी व्याजाने वाटलेले कर्ज शेकडो कोटींच्या घरात आहे.



बँकांद्वारे कर्जवाटपात सिबिल स्कोअर पाहिला जातो, शिवाय जास्तीची कागदपत्रेही मागितली जातात. अनेकदा शेतकऱ्यांजवळ पुरेशी कागदपत्रे नसतात. बँकांद्वारे कर्जवाटपात दिरंगाईचे प्रकार होतात. त्यामुळे आर्थिक अडचणीतील शेतकऱ्यांना सावकाराच्या दारी जावे लागते. सहकार विभागाद्वारे ५०० रुपयांत सावकारीचा परवाना मिळत असल्याने जिल्ह्यात सावकारांची संख्या दिवसेंदिवस वाढतीच आहे. सद्यःस्थितीत जिल्ह्यात ६३५ परवानाधारक सावकार आहेत. परवानाधारक सावकारांना कृषी कर्ज वाटपास मनाई असली तरी बिगर कृषी कर्ज, तारण कर्ज व बिगर तारण कर्ज या प्रकारांमध्ये जिल्ह्यात रेकार्डवर २५४ कोटींचे कर्जवाटप केले आहे. कित्येक परवानाधारक सावकार अवैध सावकारीत गुंतल्याने त्यांचे व इतर विनापरवाना सावकारांचे कर्जवाटप याची माहितीच उपलब्ध होत नाही.

### सोने, चांदी प्रॉमिसरी नोटवर देतात कर्ज

जिल्हा बँक व राष्ट्रीयीकृत बँका शेती तारणावर कर्ज देतात. या व्यतिरिक्त बिगर शेती कर्ज, तारण कर्ज व बिगर तारणी कर्ज हे सोने, चांदी व प्रॉमिसरी नोटवर दिले जाते असे सहकार विभागाने सांगितले.

# हजारो दिव्यांच्या लख्ख उजेडात न्हाले यावली शहीद

## राष्ट्रसंतांचा जन्मोत्सव सोहळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०यावली शहीद**

अखिल विश्वाला सर्वधर्म समभावाची शिकवण देणाऱ्या राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा त्यांची जन्मभूमी असलेल्या यावली शहीद येथे बुधवार (दि. ३०) पहाटे साडेपाच वाजता पार पडला. या वेळी हजारो गुरुदेव भक्तांनी उपस्थिती लावली होती.



पहाटे चारपासून भजनाने जन्मोत्सवाला प्रारंभ झाला. साडेपाच वाजता त्यांचा पाळणा. मागील सप्ताह भरापासून सुरू असलेल्या महोत्सवाची आज सांगता झाली. या प्रसंगी खासदार बळवंत वानखडे आमदार राजेश वानखडे, यांच्यासह गुरुदेव सेवा मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी हजेरी लावली होती. या निमित्त रक्तदान शिबिर, स्वच्छता अभियान आदी सामाजिक उपक्रमांसह विविध प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

### महासमाधी फुलांनी सजली

गुरुकुंज मोझरी स्थित तुकडोजी महाराज यांची महासमाधी फुलांनी सजवण्यात आली होती. अनेक गुरुदेवभक्तांनी तुकडोजी महाराज यांच्या जीवनावर समाज माध्यमांतून प्रकाश टाकला. मानवता फाउंडेशन (गुरुकुंज मोझरी) व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज युवक विचार मंचच्या सदस्यांनीही घरी राहून ग्रामजयंती साजरी केली.

जन्मोत्सव सोहळ्याच्या निमित्ताने गावातील प्रत्येक घरासमोर आकर्षक रांगोळी तसेच पणत्यांनी आकर्षक सजावट करण्यात आली होती. जन्मोत्सवानंतर सामुदायिक ध्यान करण्यात आले. त्यानंतर बाहेरगावहून आलेल्या पालख्यांची पदयात्रा देखील यावली शहीद या गावातून काढण्यात आली होती.

दरवर्षीच्या तुलनेत या वर्षी गुरुदेव भक्तांनी मोठ्या संख्येने या ग्राम जयंती कार्यक्रमाला हजेरी लावली होती.

# अचलपुरात मद्यपींचा धुमाकूळ : महिला त्रस्त

## पोलिसांचे दुर्लक्ष वरिष्ठांनी लक्ष द्यावे मद्यपींचा बंदोबस्त करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अचलपूर**

अचलपूर येथे वेगवेगळ्या भागात मध्यपींनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून त्यामुळे महिलावर्ग व शांतिप्रिय नागरिक त्रस्त झाले आहेत पोलिसांचे याकडे जाणून बुजून दुर्लक्ष असून वरिष्ठांनी या प्रकरणी लक्ष घालून मद्यपिंचा बंदोबस्त करावा अशी मागणी जनतेतून होत आहे अचलपूर हे शहर गोरगरिबांचे शहर म्हणून ओळखले जाते या ठिकाणी बहुतांशी मजूर वर्ग आहे त्यामुळे महिला आणि पुरुष दोन्हीही कष्टकऱ्याचे काम करत असतात संध्याकाळी काम करून थकूनआल्यानंतर झोप व आरामाची गरज असते परंतू रात्री ८ वाजेनंतर मद्यपींचा धुमाकूळ सुरु होतो त्यामुळे त्यांना रात्रीचा आराम करणे कठीण झाले आहे मद्यपी मद्य प्राशान केल्यानंतर जोरजोरात शिवीगाळ करणे एखाद्याला मारायला धावणे एखाद्या शांतप्रिय नागरिकाला



तथा महिलेला अश्लील शिवीगाळ करणे हातवारे करणे एखादयाच्या घरात घुसणेयामुळे शांतिप्रिय नागरीक तथा महिला त्रस्त झाले आहेत पोलीस मात्र या संदर्भात कुठलीही कारवाई करायला तयार असल्याची दिसत नाही . सदर मद्यपींचा धुमाकूळ जुना कचरा डेपो, नामदार गंज ,बेगमपुरा ,गांधी पूल, दुल्हागेट, खिडकी गेट ,देवडी, चित्रपटगृह ,जीवन पुरा, विदर्भमिल स्टॉप,सरायपुरा ,दिलदिलदापुरा, विलायत पुरा, श्रीकृष्ण पुल यासह आदी ठिकाणी असतो पोलीस मात्र यामध्ये बोटचेपे धोरण स्वीकारत असल्याचे दिसून येत असते या संदर्भात स्थानिक पोलीस कुठलीही कारवाई करत नसल्याने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी याप्रकरणी लक्ष घालून मद्यपींच्या मुसक्या बांधाव्या व ज्या भागात मध्ये धुमाकूळ घालतात त्या भागातील वीट जमदार यांच्यावरही कारवाई करून ठाणेदारांना समज देण्यात यावी अशी जोरदार मागणी जनतेकडून होत आहे.

# आ.प्रतापदादा अडसड यांच्या प्रयत्नाने १०४ गावे झाली डार्क झोन मुक्त

## शेतकऱ्याना मिळणार सिंचनाच्या विहिरीचा लाभ मतदार संघातील गावाचा उठविला डार्क झोन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ३० धामणगाव रेल्वे**

अनेक वर्षांपासून तिन्ही तालुक्यातील केंद्रीय भूजल महामंडळाने जाहीर केलेल्या १०४ गावामधील डार्क झोन काढण्यात आ प्रताप अडसड यांना यश आले असून आता या गावातील शेतकऱ्यांना सिंचन विहिरीचां लाभ मिळणार आहे

प्रशासनाचा दांडगा अनुभव, जिद्द व मतदारांना दिलेला शब्द प्रत्यक्षात पुर्णत्वास नेण्यासाठी आ प्रतापदादा अडसड, सर्वसामान्यांच्या वेगवेगळ्या समस्या सोडवित आहे

मतदार संघातील चांदुर रेल्वे धामणगाव रेल्वे नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील भूगर्भातील पाण्याची पातळी केंद्रीय भूजल मंडळाच्या मानकांपेक्षा कमी झाल्यामुळे २००४ पासून तिन्ही तालुक्यातील अनेक गावे डार्क झोन म्हणून जाहीर करण्यात होती. त्यामुळे या भागातील विहिरी खोदण्यासाठी कायदेशीर परवानगी नसल्याने सिंचनासाठी पाणी उपलब्ध होत नव्हते. एवढेच नव्हे तर ज्या शेतकऱ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना, मनरेगा धडक सिंचन या शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून विहीर बांधण्यासाठी अनुदान मिळत होते. मात्र, डार्क झोनच्या अडचणीमुळे संबंधित गावातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी शेतात विहीर खोदता येत नव्हतीशेतकऱ्याने जबरदस्तीने विहीर बांधकाम किंवा विंधन विहीर खोदण्याचा प्रयत्न केला तर गुन्हे सुद्धा दाखल होत होते. त्यामुळे तिन्ही तालुक्यातील शेतकऱ्यांना डार्क झोनचा मोठा फटका बसत होताभूजल महामंडळाच्या आदेशाने शेतकरी कंटाळला होता.

### आ. प्रतापदादा अडसड यांनी केली वचनपूर्ती

आ. प्रतापदादा अडसड दुसऱ्यांदा निवडून आल्यानंतर आपल्या विधानसभा क्षेत्रासाठी ज्वलंत असलेला डार्क झोनचा मुद्दा ऐरणीवर घेऊन केंद्रीय भूजल मंडळाकडे सातत्याने युक्तिवाद करून पाठपुरावा केला केंद्रीय भूजल महामंडळाला नवीन सर्व्हेक्षण करण्यासाठी चर्चा केली. आता भूजल मूल्यांकनची प्रक्रिया पूर्ण झालेली असून त्याला केंद्र शासनाची मंजुरी मिळाल्याने १५४ पैकी १०४ गावांमधील डार्क झोनचा शाप उठल्यामुळे शेतकरी, अनुसूचित जाती जमातीच्या लाभार्थ्यांना फायदा होणार आहे.निवडणुकी दरम्यान दिलेल्या शब्दाची वचनपूर्ती त्यांनी केली आहे



तिन्ही तालुक्यातील मागील २० वर्षापासून शासनाच्या सर्वेक्षणामुळे विहीर किंवा बोअर तयार करण्यासाठी मनाई केल्याने शेतकरी सिंचन विहिरींपासून वंचित होते. आपण निवडणुकीत सिंचनाचा प्रश्न तात्काळ सोडवण्याचा प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार प्रयत्न सुरू केले. आपल्या मतदारसंघातील १०४ गावं डार्क झोन मधून बाहेर आल्याने हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला उर्वरित गावडार्क झोन मधूनबाहेर काढण्यासाठी प्रयत्न करणार आहे

**प्रतापदादा अडसड**
**आमदारधामणगाव विधानसभा मतदारसंघ**

# भाजपचे माजी आमदार रामदास आंबटकर यांचे निधन

## भाजप-अभाविप वर्तुळात शोककळा विदर्भात संघटन वाढविण्यात मौलिक योगदान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नागपूर**

विधानपरिषदेचे भाजपचे माजी आमदार डॉ.रामदास आंबटकर (६४) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. चेन्नई येथील रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेशी अनेक वर्ष जुळले होते. ते विधान परिषदेचे सदस्य म्हणून वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले होते. त्यांच्या निधनामुळे भाजप व अभाविप वर्तुळात शोककळा पसरली आहे.

मागील काही दिवसांपासून ते किडनीच्या आजाराने ग्रस्त होते. त्यातच त्यांना न्युमोनियाचे निदान झाले. त्यांच्यावर अगोदर नागपुरातील एका खाजगी इस्पितळात उपचार सुरू होते व त्यानंतर त्यांना चेन्नई येथील महात्मा गांधी मेडिकल मिशन हेल्थकेअर सेंटर येथे त्यांना हलविण्यात आले होते. बुधवारी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. डॉ. रामदास आंबटकर यांचा जन्म १ जुलै १९६० रोजी महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यातील वडनेर या छोट्याशा गावात झाला. लहानपणापासूनच ते संघाचे स्वयंसेवक होते. १९७९ मध्ये यवतमाळमध्ये अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ता झाले. त्यानंतर अभाविप यवतमाळ शहर सरचिटणीस, विस्तारक आणि अभाविपचे पूर्णवेळ कार्यकर्ते बनले. त्यानंतर अभाविपच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य, विदर्भ प्रदेश संघटन सचिव म्हणूनदेखील त्यांनी जबाबदारी सांभाळली. ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे सिनेट तसेच व्यवस्थापन परिषद सदस्यदेखील होते. २००४ मध्ये त्यांनी राजकीय क्षेत्रात काम सुरू केले. २०१५ मध्ये त्यांना भाजप महाराष्ट्रचे सरचिटणीस बनवण्यात आले.

### गडकरींनी व्यक्त केला शोक

डॉ.आंबटकर यांच्या निधनाचे वृत्त ऐकून अतिशय दु:ख झाले. विदर्भात भाजप आणि अभाविपचे संघटन मजबूत करण्यासाठी त्यांनी मौलिक परिश्रम केले होते. विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या हितासाठी त्यांनी नेहमी आवाज उचलला होता. कुशल संघटक आणि विचारधारेप्रति समर्पित असलेल्या डॉ.आंबटकर यांच्या निधनामुळे विदर्भातील सामाजिक-राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली आहे.

**- नितीन गडकरी,**
**केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री**

# धामणगाव कृषी उत्पन्न बाजार समिती बनली 'स्मार्ट' जिल्ह्यातून द्वितीय,तर राज्यात अठराव्या स्थानी

## शासनाच्या पणन संचालनालयामार्फत यादी जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०धामणगाव रेल्वे**

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील कामगिरीच्या आधारावर रैंकिंग (दर्जा) जाहीर झाला आहे. यामध्ये धामणगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने जिल्ह्यातील १२ बाजार समित्यांमधून द्वितीय क्रमांक तर विभागामधून सातवा तर राज्यामधून अठरावा क्रमांक पटकाविला आहे.



यावर्षीच्या रँकिंगमध्ये बाजार समित्यांच्या आर्थिक व्यवस्थापन, कामकाज, आणि शेतकऱ्यांसाठी पुरवलेल्या सोयीसुविधा यांसारख्या घटकांचा विचार करण्यात आला. एकूण ३०५ बाजार समित्यांचे मूल्यांकन करण्यात आले होते. यावेळी राज्यातील अनेक बाजार समित्यांनी आर्थिक अडचणींवर मात करत चांगली कामगिरी दर्शवली आहे. खाजगी बाजारांची वाढती स्पर्धा लक्षात घेता शेगाव बाजार समितीने आता आधुनिकीकरणावर भर देण्यास सुरुवात केली आहे. शेतकऱ्यांना चांगल्या सुविधा पुरवणे, मालाची गुणवत्ता तपासणे, आणि वेळेवर व्यवहार करणे यावर अधिक लक्ष केंद्रित केले जात आहे. बाजार समितीने मुख्य बाजार आवारात संगणकीकृत वजन काटे, तसेच ऑनलाइन पेमेंटची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. बाजार समित्यांच्या या रैंकिंगमुळे चांगली कामगिरी करणाऱ्या समित्यांचे मनोबल वाढले आहे, तर ज्या समित्या मागे राहिल्या आहेत, त्यांना अधिक चांगली कामगिरी करण्याची प्रेरणा मिळाली आहे. या क्रमवारीमुळे बाजार समित्यांना त्यांच्यातील त्रुटी ओळखण्यास आणि सुधारणा करण्यास मदत होईल.दरम्यानधामणगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने जिल्ह्यातील १२ बाजार समित्यांमधून द्वितीय क्रमांक तर विभागामधून सातवा तर राज्यामधून अठरावा क्रमांक पटकाविला आहे.बाजार समितीच्या सभापती कविता गावंडे, उपसभापती संगीता गाडे, सचिव प्रवीण वानखडे यांचेसह संचालक चंदा निस्ताने,प्रमोद रोंघे,विपीन ठाकरे,रवि भुतडा,सचिन सोमोसे,संदीप दावेदार,मेघा सबाने,दिनेश जगताप,देवराव बमनोटे,मुकुंद माहोरे,मंगेश बोबडे,विलास भिल,प्रशात हुडे,गिरीष भुतडा, राधेश्याम चांडक,सुनिल ठाकरेव कर्मचारी वृंद तसेच सर्व बाजार घटकांचे सर्वत्र कौतुक केले आहे.(कलर बॉक्स)असे झाले 'स्मार्ट' गुणांकन

अमरावती विभागातून७ वा व राज्यातून २२ वा क्रमांक मिळविण्यासाठी बाजार समितीला पायाभूत सुविधा व इतर सेवा सुविधा निकषांमध्ये एकूण ६० गुण, आर्थिक निकषांमध्ये १९ गुण, वैधानिक कामकाज निकषांमध्ये ४३ गुण व इतर निकषांमध्ये २९ गुण असे २०० पैकी १४१ गुण प्राप्त झाले आहे. स्मार्ट प्रकल्प अंतर्गत करण्यात आलेल्या गुणांकन प्रक्रियेत बाजार समिती पात्र ठरली.

# सरकारी कार्यालयांचीही 'परीक्षा',उत्तीर्ण होण्यासाठी हवे १०० पैकी ४० गुण

**विदर्भ पराजासत्ताक**
**दि. ३० नागपूर**

सरकारी काम आणि सहा महिने थांब असे सरकारी कार्यालयाच्या कामाचे वर्णन केले जाते. मात्र हळूहळू हे चित्र बदलताना दिसते. ऑनलाईन सेवा, सेवा हक्क कायदा यामुळे प्रशासनाला गती देण्याचा प्रयत्न सरकारकडून सुरू आहेत. त्याचेच पुढचे पाऊल सरकारचा शंभर दिवसाचा कार्यक्रम आहे. कामकाज सुधारण्यासाठी प्रत्येक कार्यालयाला एका परीक्षेलाच तोंड द्यावे लागणार आहे.



सरकारच्या १०० दिवसांच्या कृती आरखड्यांतर्गत कार्यालयांमध्ये कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहिम राबविण्यात येत आहे.कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेंतर्गत संकेतस्थळ, सुकर जीवनमान, स्वच्छता, जनतेच्या तक्रारींचे निवारण, कार्यालयीन सोयी व सुविधा, अधिनस्त कार्यालयांना भेटी आदी मानकांवर कार्यालयांचे मुल्यमापनहोणार आहे.यासाठी राज्य शासनाचे महामंडळे, महसूल विभागस्तरीय कार्यालये, जिल्हास्तरीय आणि तालुकास्तरीय कार्यालयाने या मानकांची अंमलबजावणी करून शासनास सादर करायचे आहे.राज्यातील १२ हजार ५०० शासकीय व निमशासकीय कार्यालये या विशेष मोहिमेंतर्गत सहभागी होत असून प्रत्येक कार्यालयाने १०० पैकी किमान ४० गुण मिळविणे गरजेचे आहे. याकरिता नियतपद्धतीने मुल्यमापन करण्यात येत असून अंतिम निवड झालेल्या कार्यालयांचे भारतीय गुणवत्ता परिषदेद्वारे (क्युसीआय) परिक्षण करण्यात येणार आहे. पुढील महिण्यात यासंदर्भातील अंतिम निकालही जाहिर करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांनी दृरदुष्यप्रणालीद्वारे मंगळवारी राज्यातील सर्व विभागांचा आढावा घेतला. नागपूर विभागाच्या वतीने विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्यासह नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मीना, मुख्य वनसंरक्षक वनोवृत्त ए. श्रीलक्ष्मी, विभागीय आयुक्तालयातील समान्य प्रशासन अपर आयुक्त तेजुसिंग पवार, महसूल अपर आयुक्त राजेश खवले, जलसंपदा (गोसेखुर्द) मुख्य अभियंता रा. गो. पाटील, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे मुख्य अभियंते दिलीप दोडके, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंते सुभाष भुजबळ यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.





